दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक २५७ । मंगळवार ३० जून २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com




## महत्त्वाचे..

### एचआरएसपी नंबर प्लेट नसलेल्या वाहनांवर एक जुलैपासून कारवाई

मुंबई : राज्यातील १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट (एचआरएसपी) बसविण्यासाठी ३० जून २०२६ ही अंतिम मुदत असून, त्यानंतर १ जुलैपासून नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनधारकांवर मोटार वाहन कायद्यानुसार कडक कारवाई करण्यात येणार आहे. तसेच एचआरएसपी न बसविलेल्या वाहनांची आरटीओमधील अनेक महत्त्वाची कामेही रोखण्यात येणार आहेत. एचआरएसपी नंबर प्लेट न बसविणाऱ्या वाहनधारकांना वाहन हस्तांतरण, पत्ता बदल, कर्जबोजा चढविणे किंवा उतरविणे, वाहनाची पुनर्नोंदणी, वाहनातील बदल तसेच परवाना नूतनीकरण यांसारख्या आरटीओमधील सेवा उपलब्ध होणार नाहीत. मात्र, वाहनाच्या फिटनेस प्रमाणपत्राच्या नूतनीकरणासाठी ही अट लागू राहणार नाही.दरम्यान, ३० जूनपर्यंत एच आर एस पी बसविण्यासाठी अधिकृतपणे अपॉइंटमेंट घेतलेल्या वाहनधारकांना १ जुलैपासून सुरू होणाऱ्या दंडात्मक कारवाईतून तात्पुरता दिलासा देण्यात आला .

## महाराष्ट्रात ‘शहा सेना’ मजबूत करून

# फडणवीसांचा पत्ता कट करण्याचे कारस्थान

### खाऊसाहेब दिसले तर सोडू नका; गद्दारांना जनता धडा शिकवेल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सोमवारी शिर्डी दौऱ्यात भाजप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेवर अभूतपूर्व हल्लाबोल करत महाराष्ट्रातील आणि राष्ट्रीय राजकारणात मोठी खळबळ उडवणारे दावे केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे भविष्यात पंतप्रधानपदाच्या शर्यतीतील संभाव्य दावेदार असल्याने त्यांनाच भाजपमध्ये बाजूला करण्याचे कारस्थान सुरू आहे, असा गंभीर आरोप त्यांनी केला.

राहता येथील जाहीर सभेत बोलताना ठाकरे म्हणाले, महाराष्ट्रात भाजपपेक्षा 'शहा सेना' अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न सुरू आहे. शिंदे गटाच्या माध्यमातून भाजपचीच ताकद कमी करून भविष्यातील राष्ट्रीय राजकारणाची समीकरणे बदलण्याचे प्रयत्न सुरू असून, फडणवीस यांना दिल्लीच्या राजकारणापासून दूर ठेवण्यासाठी त्यांचे राजकीय पंख छाटले जात आहेत, असा दावा त्यांनी केला.

मिळाव्यास आ. आदित्य ठाकरे, खा. संजय राऊत, खा. अनिल देसाई, खा. अरविंद सावंत, खा. राजाभाऊ वाजे, जिल्हा संपर्कप्रमुख


छाया : अशोक दुशिंग, शिर्डी.

सुनिल शिंदे, जिल्हा प्रमुख सचिन कोते, राहाता तालुका प्रमख संजय शिंदे उपस्थित होते.

यावेळी शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्यावरही ठाकरे यांनी अत्यंत कठोर शब्दांत टीका केली. खाऊसाहेब असा उल्लेख करत, त्यांना परत आणू नका; दिसले तर सोडू नका. गद्दारीची जनता योग्य किंमत मोजायला लावेल, असे आवाहन त्यांनी शिवसैनिकांना केले. वाकचौरे यांच्यावर टीका करताना त्यांच्या राजकीय भूमिकेवर आणि पक्षांतरावरही त्यांनी जोरदार प्रहार केला.

महिला आरक्षणाच्या मुद्द्यावर बोलताना ठाकरे म्हणाले की, महिला आरक्षणाच्या नावाखाली देशाचे राजकीय विभाजन करण्याचा भाजपचा प्रयत्न सुरू आहे. त्यासाठी विरोधी पक्षांतील खासदार फोडण्याचे (पान ४ वर)

# कर्जमाफी जुलैच्या दुसऱ्या आठवड्यात!

### अटी–निकषांबरोबर टाईमलाईन बदलली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

- ५६ लाख शेतकऱ्यांसाठी ₹३६,५८५ कोटींचे पॅकेज
- विधानसभेत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची घोषणा

**मुंबई :** ३० जूनपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात कर्जमाफीची रक्कम जमा करण्याचे आश्वासन देणाऱ्या राज्य सरकारने आता या योजनेच्या अंमलबजावणीची नवी वेळ जाहीर केली आहे. 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना–२०२६' अंतर्गत कर्जमाफीचा लाभ जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्यास सुरुवात होईल, अशी महत्त्वपूर्ण घोषणा कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सोमवारी विधानसभेत केली. याचबरोबर योजनेतील अनेक अटी व पात्रतेच्या निकषांमध्ये बदल करण्याचे संकेत देत सरकार अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ मिळेल, असेही स्पष्ट करण्यात आले.

२०२६–२७ च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर देताना कृषिमंत्री भरणे म्हणाले की, कर्जमाफीसाठी आवश्यक आर्थिक तरतुदीला विधिमंडळाची मंजुरी आणि त्यानंतर राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर निधी वितरित केला जाईल. त्यामुळे ५ जुलैनंतर प्रत्यक्ष अंमलबजावणीला सुरुवात होऊन (पान ४ वर)

**कर्जमाफीचा आराखडा**

| | |
|---|---|
| योजना : | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना – २०२६ |
| कर्जमाफी मर्यादा : | ₹२ लाखांपर्यंत |
| लाभार्थी : | सुमारे ५६ लाख शेतकरी |
| एकूण तरतूद : | ₹३६,५८५ कोटी |
| नियमित कर्जफेड करणाऱ्यांना : | ₹५० हजार प्रोत्साहनपर अनुदान |
| प्रत्यक्ष लाभाची सुरुवात : | जुलैचा दुसरा आठवडा |

अटी व पात्रतेच्या निकषांमध्ये बदल करण्याचे सरकारचे संकेत.

# विनाअट सरसकट कर्जमाफीसाठी भरपावसात अन्नदात्याचा एल्गार!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संभाजीनगर:** राज्यातील महायुती सरकारच्या कर्जमाफी धोरणाविरुद्ध आणि शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी महाविकास आघाडीने छत्रपती संभाजीनगरातून एल्गार पुकारला आहे. शेतकऱ्यांना विनाअट आणि सरसकट कर्जमाफी मिळवून देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद चंद्र पवार) पक्षाचे युवा नेते आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली केंब्रिज चौकात सोमवारी भरपावसात 'एल्गार अन्नदात्याचा' महाआंदोलन छेडण्यात आले.

भरपावसातही मविआच्या नेत्यांनी आणि हजारो कार्यकर्त्यांनी सरकारविरोधात दिलेल्या प्रचंड घोषणाबाजीने संपूर्ण परिसर दणाणून सोडला होता. तब्बल अडीच तास चाललेल्या या तीव्र रास्ता रोको आंदोलनामुळे महामार्गाच्या चारही बाजूंनी वाहनांच्या मैलोन्मैल लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

या संदर्भात सविस्तर माहिती अशी की, राज्य शासनाने जाहीर केलेली चालू कर्जमाफी पूर्णपणे फसवी असून, त्यातील क्लिष्ट व जाचक अटींमुळे मराठवाड्यासह राज्यातील हजारो शेतकरी कर्जमाफीसाठी अपात्र ठरत आहेत. या अन्यायाविरुद्ध आमदार रोहित पवार यांनी यापूर्वी पंढरपूर येथे आमरण उपोषण केले होते. त्यावेळी सरकारने दिलेले ठोस (पान ४ वर)




**सुप्रिया सुळे, अनिल देशमुख अन् राजेश टोपेंची पोलिसांकडून धरपकड**



आंदोलनाची वाढती तीव्रता आणि वाहतूक कोंडी लक्षात घेऊन केंब्रिज चौकातील चारही रस्त्यांवर पोलिसांचा कडेकोट आणि छावणीवजा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. रास्ता रोको सुरू झाल्यानंतर काही वेळातच गोंधळ वाढल्याने महिला पोलीस अधिकाऱ्यांनी राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे यांना बळजबरीने ओढत पोलिसांच्या व्हॅनमध्ये बसवून ताब्यात घेतले. त्यानंतर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खासदार डॉ. कल्याण काळे, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, माजी मंत्री राजेश टोपे आदी बड्या नेत्यांची पोलिसांनी एकापाठोपाठ एक धरपकड केली. मात्र, नेत्यांना ताब्यात घेऊन नेल्यानंतरही आमदार रोहित पवार हे स्वतः शेवटपर्यंत कार्यकर्त्यांसह भरपावसात रस्त्यावर ठाण मांडून बसले होते.

## नसरापूर प्रकरणातील आरोपीला मृत्युदंडाची शिक्षा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**पुणे :** पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षीय चिमुकल्या मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिची निर्घृण हत्या केल्याप्रकरणी विशेष न्यायालयाने ६५ वर्षीय भीमराव प्रभाकर कांबळे याला दोषी ठरवत फाशीची शिक्षा सुनावली. विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंके यांनी सोमवारी हा महत्त्वपूर्ण निकाल दिला. अल्पावधीत सुनावणी पूर्ण करून निकाल देण्यात आल्याने राज्यातील जलदगती न्यायप्रक्रियेतील हा एक महत्त्वाचा निर्णय मानला जात आहे.

या प्रकरणाची सुनावणी २५ जून रोजी पूर्ण झाली होती. त्यावेळी न्यायालयाने आरोपी बलात्कार व हत्येच्या आरोपांमध्ये दोषी असल्याचे स्पष्ट केले होते. शिक्षेवरील अंतिम निर्णय देताना न्यायालयाने गुन्ह्याचे स्वरूप अत्यंत क्रूर, अमानुष आणि समाजमन सुन्न करणारे असल्याचे नमूद केले.

शिक्षेच्या मुद्द्यावर सरकारी पक्ष आणि बचाव पक्षाचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या 'शंकर खाडे' प्रकरणातील निर्णयाचा संदर्भ घेतला. सरकारी पक्षाचे विशेष सरकारी वकील ॲड. अजय मिसर यांनी आरोपीला मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्याची मागणी करत विविध न्यायालयीन निर्णयांचे १२ संदर्भ न्यायालयासमोर मांडले. निकालाचे वाचन करताना न्यायालयाने स्पष्ट केले की, मृत्युदंडाची शिक्षा (पान ४ वर)

# १३ वर्षांचा ‘महसूल घोटाळा’ उघड

### १९७ जणांवर गुन्हे, ॲक्शन टेकन रिपोर्ट’ हिवाळी अधिवेशनात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**मुंबई :** नाशिक महानगरपालिका क्षेत्रात सर्वसमावेशक गृहनिर्माण धोरणांतर्गत गरिबांच्या घरांवर डल्ला मारणारा गेल्या १३ वर्षांतील मोठा घोटाळा महसूल विभागाने शोधून काढला आहे. यात आतापर्यंत १९७ आरोपी निष्पन्न झाले असून १०४ जणांवर एफआयआर दाखल करण्यात आला आहे. याबाबतचा ॲक्शन टेकन रिपोर्ट हिवाळी अधिवेशनात सादर करण्यात येईल, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

विधानपरिषदेत शिवसेना आमदार अनिल परब यांनी नाशिकमधील भूखंड घोटाळ्याबाबत मांडलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना महसूलमंत्री बावनकुळे बोलत होते.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, एसआयटीने या प्रकरणाची व्याप्ती मोठी असल्याने दोन महिन्यांची मुदतवाढ मागितली आहे. १८ ऑगस्ट २०२६ पर्यंत एसआयटीचा अंतिम अहवाल येईल. त्यानंतर पुढील दोन महिन्यांत सरकार त्यावर स्क्रुटिनी करेल. नगर विकास मंत्रालय आणि महसूल विभागामार्फत आगामी डिसेंबरच्या हिवाळी अधिवेशनात या संपूर्ण घोटाळ्याचा 'ॲक्शन टेकन रिपोर्ट' सभागृहासमोर ठेवला जाईल. कोणत्याही दोषीला यात सोडले जाणार नाही, असा शब्दही त्यांनी यावेळी दिला.

नगर विकास विभागाच्या ८ नोव्हेंबर २०१३ च्या नियमानुसार, ४ एकर किंवा त्यापेक्षा जास्त मोठ्या भूखंडावर गृहप्रकल्प (लेआउट) उभारताना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी २० टक्के घरे किंवा जागा राखून ठेवणे आणि ती म्हाडाकडे हस्तांतरित करणे (पान ४ वर)

**वरिष्ठ अधिकाऱ्यांची 'एसआयटी' आणि कायदेशीर कारवाई**

या घोटाळ्याच्या चौकशीसाठी सरकारने नाशिकचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय 'एसआयटी' स्थापन केली आहे. यामध्ये नाशिकचे पोलीस आयुक्त, जमाबंदी आयुक्त आणि आयजीआर दर्जाचे वरिष्ठ अधिकारी आहेत.

**१९७ आरोपींपैकी अनेकांना अटक**

आतापर्यंत ५० बनावट प्रकरणांमधील फेरफार महसूल कायद्याच्या कलम २५७ अन्वये रद्द करण्यात आले आहेत. एकूण १९७ आरोपींपैकी अनेकांना अटक करण्यात आली आहे. सर्व गुन्हे अजामीनपात्र आहेत. म्हाडाचे आर्थिक नुकसान वसूल करण्यासाठी आणि या जागा पुन्हा म्हाडाच्या ताब्यात घेऊन गरिबांना घरे देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्र्यांसोबत सकारात्मक चर्चा झाली आहे.

### अनुसूचित जाती आरक्षणातील उपवर्गीकरण विरोधात

## विधान भवनावर मोर्चा

### २७ आमदारांचे मुख्यमंत्र्यांना पत्र; ‘बदर समिती’चा अहवाल रद्द करण्याची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** अनुसूचित जाती (एससी) आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावरून राज्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरण कमालीचे तापले आहे. या प्रस्तावित उपवर्गीकरणाला तीव्र विरोध करण्यासाठी आज विधान भवनावर भव्य मोर्चा धडकणार आहे. या पार्श्वभूमीवर, अनुसूचित जातीच्या २७ आमदारांनी सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन आपली नाराजी व्यक्त केली.

आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या निर्णयामुळे अनुसूचित जातींमध्ये फूट पडू शकते आणि समाजात अंतर्गत संघर्ष निर्माण होऊ शकतो, अशी भीती व्यक्त करत या २७ आमदारांनी मुख्यमंत्र्यांना संयुक्त स्वाक्षरीचे निवेदन सादर केले आहे. अशी माहिती माजी सामाजिक न्याय मंत्री आमदार राजकुमार बडोले यांनी विधानभवनात पत्रकारांशी बोलताना दिली. सर्वपक्षीय आरक्षण समन्वय समितीने यापुर्वीच उपवर्गीकरणाच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली असून, माजी न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर समितीचा अहवाल तात्काळ रद्द करण्यात यावा, अशी प्रमुख मागणी लावून धरली आहे.

अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाची (अ, ब, क, ड) प्रस्तावित प्रक्रिया तात्काळ स्थगित करून ती कायमस्वरूपी रद्द करावी, अशी मागणी आमदारांनी मुख्यमंत्र्यांसमोर मांडली. तसेच, माजी न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर समितीचा संपूर्ण अहवाल, 'बार्टी'चा अहवाल, सर्व मूळ आकडेवारी, संशोधन पद्धती, सर्वेक्षण अहवाल, बैठकींचे इतिवृत्त आणि शिफारशी सरकारने तात्काळ सार्वजनिक कराव्यात, अशी मागणी करत अहवाल सार्वजनिक केल्याशिवाय कोणतीही पुढील कार्यवाही करू नये, अशी भूमिका घेतली असल्याचे बडोले यांनी सांगितले यावेळी माजी मंत्री आमदार संजय बनसोडे उपस्थित होते.

# अहिल्यानगरातील १.८४ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीचा दिलासा


### जिल्हा मध्यवर्ती बँकेसह राष्ट्रीयीकृत बँकांकडून पात्र खात्यांची छाननी; कर्जमाफीची अंमलबजावणी लवकरच

## बँकनिहाय पडताळणी अंतिम टप्प्यात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** राज्य शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना–२०२६' अंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील सुमारे १ लाख ८४ हजार १४० शेतकरी दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीसाठी पात्र ठरण्याची शक्यता असून, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, राष्ट्रीयीकृत बँका, ग्रामीण बँका आणि इतर सहकारी बँकांकडून लाभार्थी खात्यांची अंतिम पडताळणी सुरू आहे.

योजनेनुसार १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेले अल्पमुदतीचे पीककर्ज आणि ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेली कर्जे विचारात घेतली जाणार आहेत. पात्र शेतकऱ्यांना कमाल दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी दिली जाणार आहे. शासनाकडून बँकांनी सादर केलेल्या यादींची आधार व इतर निकषांनुसार पडताळणी झाल्यानंतर रक्कम थेट संबंधित बँकांना वितरित केली जाईल.



दरम्यान, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे तीन लाखांहून अधिक शेतकरी थकबाकीदार असल्याने नवीन पीककर्ज वितरणावर परिणाम झाला आहे. कर्जमाफीची प्रक्रिया पूर्ण होताच पात्र शेतकऱ्यांना नव्याने पीककर्ज उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

महत्त्वाचे म्हणजे, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) किंवा बँकांनी बँकनिहाय अंतिम लाभार्थी संख्या आणि कर्जमाफीची अधिकृत रक्कम अद्याप जाहीर केलेली नाही. त्यामुळे अंतिम मंजुरीनंतरच अधिकृत आकडेवारी स्पष्ट होणार आहे.

**साडेपाच हजार कोटी पीक कर्ज वितरणाचे उद्दिष्ट**

अहिल्यानगर जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामासाठी ६ लाख १४ हजार ३३३ शेतकऱ्यांसाठी ५,५४७.९५ कोटी रुपयांच्या पीककर्ज वितरणाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यापैकी अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत ३ लाख ४८ हजार ६८६ शेतकऱ्यांना ३,१८०.६८ कोटी, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांकडून २ लाख ७ हजार ९१८ शेतकऱ्यांना १,८८४.५३ कोटी, खासगी बँकांकडून ५६ हजार ४६६ शेतकऱ्यांना ४७० कोटी, तर ग्रामीण बँकांकडून १,२६६ शेतकऱ्यांना ११७ कोटी रुपयांचे पीककर्ज वाटपाचे नियोजन करण्यात आले आहे.

## लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर अत्याचार; गुन्हा दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर:** मागील तक्रार मागे घेण्यासाठी एका महिलेला बोलावून घेऊन, तिच्याशी लग्न करण्याचे खोटे आमिष दाखवत जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवल्याची धक्कादायक घटना अहिल्यानगरमध्ये घडली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिपक विश्वनाथ जावळे (रा. रानमळा मंठा, जिल्हा जालना) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला ही २३ वर्षांची असून ती खाजगी नोकरी करते. आरोपी दिपक याने पीडित महिलेला सावेडी नाका भागातील एका शाळेच्या पाठीमागे असलेल्या अपार्टमेंटमध्ये बोलावून घेतले होते. 'तू माझ्याविरुद्ध केलेली जुनी तक्रार मागे घे, मी तुझ्याशी लग्न करेन' असे खोटे आमिष त्याने महिलेला दिले. त्यानंतर त्याने पीडितेसोबत जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यावेळी आरोपीने तिला हाताने मारहाण केली. तसेच ही बाब कोणाला सांगितल्यास जीवे मारून टाकण्याची धमकी दिली. या त्रासाला कंटाळून अखेर पीडित महिलेने पोलिसांत धाव घेतली. तिच्या फिर्यादीवरून तोफखाना पोलिसांनी आरोपी दिपक जावळे याच्याविरुद्ध मारहाण, धमकी आणि अत्याचाराच्या विविध कलमांतर्गत गुन्हा नोंदवला आहे. या घटनेचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक एकसिंगे आणि महिला सहायक पोलीस निरीक्षक कल्पना चव्हाण करत आहेत.

# रक्तावरील दरोडा: वैद्यकीय क्षेत्राला लागलेली भ्रष्टाचाराची कीड !

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

मानवी संवेदनशीलता, आत्यंतिक कृतज्ञता आणि उदात्त भावनेचे सर्वोच्च प्रतीक म्हणजे 'रक्तदान'. ''रक्तदान हेच श्रेष्ठदान'' हे घोषवाक्य आपल्या समाजाने केवळ ऐकलेले नाही, तर ते मनामनात रुजवले आहे. जेव्हा एखादा सामान्य नागरिक रक्तदान शिबिरात जातो, तेव्हा त्याच्या डोक्यात केवळ एकच विचार असतो– आपल्या रक्ताचा एक थेंब कोणाचे तरी प्राण वाचवेल. रक्तदानानंतर मिळणारा एक कप चहा किंवा कॉफी आणि चार बिस्किटे, यापलीकडे त्या दात्याची कोणतीही अपेक्षा नसते. समाजातल्या याच पवित्र भावनेचा, विश्वासाचा आणि थेट मानवी रक्ताचाच जर काही नराधम काळाबाजार करणार असतील, तर त्यापेक्षा मोठे पाप दुसरे कोणतेही असू शकत नाही. मुंबईतील 'सर जे. जे. महानगर रक्तपेढी'मध्ये उघडकीस आलेले संतापजनक प्रकरण म्हणजे मानवी रक्तावर घातलेला उघड दरोडा आहे. 'महाराष्ट्र टाइम्स'ने या प्रकरणातील गैरप्रकार चव्हाट्यावर आणून वैद्यकीय क्षेत्रातील एका अत्यंत भीषण आणि काळ्या पर्दाफाश केला आहे. या प्रकरणाची व्याप्ती आणि त्यामागील निर्लज्जपणा पाहता, आता केवळ चौकशीचे फारस करून चालणार नाही, तर या टोळीवर थेट फौजदारी कारवाईची तीव्र शस्त्रक्रिया करण्याची वेळ आली आहे. या संपूर्ण प्रकरणाची पार्श्वभूमी समजून घेतली, तर भ्रष्टाचाराची पाळेमुळे किती खोलवर रुजली आहेत आणि मानवी जिवाची किंमत कशी शून्य केली गेली आहे, हे स्पष्ट होते. जे. जे. रुग्णालय हे महाराष्ट्रातील आणि देशातील लाखो गरीब रुग्णांसाठी आशेचा किरण आहे. मात्र, याच जे. जे. रुग्णालयाच्या परिसराचा वापर करून चालणाऱ्या 'सर जे. जे. महानगर रक्तपेढी'ने जे पापकृत्य केले, त्याने संपूर्ण राज्याची मान शरमेने खाली गेली आहे. (येथे हे आवर्जून अधोरेखित केले पाहिजे की, या पापकृत्याशी मूळ जे. जे. रुग्णालयाचा काहीही संबंध नाही.) या महानगर रक्तपेढीने चिंचपोकळी भागातील एका स्थानिक मंडळाच्या मदतीने एका भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले. नागरिकांनी विश्वासाने रक्त दिले. त्यातून संकलित झालेल्या ७७ रक्तपिशव्यांपैकी किमान ५५ रक्तपिशव्या कोणत्याही कायदेशीर प्रक्रियेविना, एक छदामही न आकारता, थेट बदलापूरच्या 'माया' नामक एका खासगी रक्तपेढीला वळत्या करण्यात आल्या.

हा काही चुकून झालेला प्रकार नक्कीच नाही. सरकारी किंवा निमसरकारी रक्तपेढीतील रक्त साठा कोणत्याही मोबदल्याशिवाय आणि नियमांचे उल्लंघन करून खासगी रक्तपेढीला दिला जाऊ शकतो? 'स जे. जे. महानगर रक्तपेढी'चे संचालक डॉ. हितेश पगारे आणि सामाजिक वैद्यकीय अधिकारी अजय भिसे यांचे बदलापूरच्या 'माया' रक्तपेढीतील चालकांशी असलेले हितसंबंध आणि लागेबांधे आता जगजाहीर झाले आहेत. सामान्य जनतेने विश्वासाने दिलेले रक्त खासगी फायद्यासाठी विकण्याचा, त्याचा काळाबाजार करण्याचा हा थेट कट होता. राज्य रक्त संक्रमण परिषदेने प्राथमिक चौकशीत हा प्रकार उघडकीस आणून या रक्तपेढीला केवळ दंड केला; पण हा दंड म्हणजे पाठीवर मारल्यासारखा प्रकार आहे. कारण, जशी जशी चौकशी पुढे सरकली, तशी या रक्तपेढीची अधिक भयानक रूपे समोर आली. रक्तसंकलनातील ढिसाळपणा, कमालीच्या त्रुटी आणि सर्वात धक्कादायक म्हणजे अनारोग्यकारक, दूषित रक्ताचे वितरण रुग्णांना केले गेल्याचे उघड झाले. हे केवळ आर्थिक गैरव्यवहाराचे प्रकरण नाही, तर हजारो निरपराध रुग्णांच्या जीवाशी खेळण्याचा, त्यांना मृत्यूच्या दारात ढकलण्याचा क्रूर कट आहे.

रक्तपेढ्या आणि रक्तदान हा विषय थेट माणसाच्या जगण्या-मरण्याशी जोडलेला असतो. अपघातग्रस्तांना, प्रसूती दरम्यान महिलांना, थॅलेसेमियाच्या रुग्णांना किंवा मोठ्या शस्त्रक्रियांच्या वेळी रक्ताची तातडीने गरज भासते. अशा वेळी रक्तपेढ्या या 'जीवनदायिनी' ठरतात. मात्र, जे. जे. महानगर रक्तपेढीसारखी उदाहरणे या पवित्र धारणेला काळीमा फासणारी आहेत. आज या लाल रक्ताचा काळाबाजार करून कोट्यवधी रुपयांनी स्वतःच्या तुंबड्या भरणाऱ्या टोळ्या कार्यरत झाल्या आहेत. रक्तदान शिबिरे आयोजित करण्याचे नियम, रक्त साठवणुकीचे निकष, त्याचे वितरण आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे नवीन रक्तपेढ्यांच्या मंजुरीचे निकष या सगळ्याच गोष्टींना या बाजारात धाब्यावर गेले आहे. आपल्या राज्यात जसे कीय नेते साखर कारखान्यांच्या कंवा शिक्षण संस्थांच्या मंजुरीसाठी आपले वजन आणि राजकीय दबाव वापरतात; दुर्दैवाने आता रक्तपेढ्यांच्या मंजुरीसाठीही तसेच 'वजन' वापरले जाऊ लागले आहे. यावरूनच या ात किती मोठ्या प्रमाणावर राकडमाया' आणि काळा पैसा फिरत आहे, याचा अंदाज येतो. रक्तपेढी चालवणे हा आता समाजसेवेचा भाग न राहता, काही धनदांडग्यांसाठी आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांसाठी नफा कमावण्याचा एक सोपा धंदा बनला आहे. अर्थात, राज्यातील सर्वच रक्तपेढ्या अशा आहेत असे म्हणून प्रामाणिकपणे काम करणाऱ्यांना संशयाच्या पिंजऱ्यात उभे करणे चुकीचे ठरेल; परंतु या एका प्रकरणामुळे संपूर्ण यंत्रणेची तात्काळ 'झाडाझडती' घेणे अनिवार्य झाले आहे. या सर्व गैरव्यवहारांचे नियंत्रण करण्याची अंतिम जबाबदारी राज्य रक्तसंक्रमण परिषदेची (डइढउ) असते. या परिषदेवर आरोग्य संचालनालयाचे नियंत्रण असते आणि हे संचालनालय थेट राज्य सरकारच्या आरोग्य मंत्रालयाच्या अखत्यारीत येते. त्यामुळे, या संपूर्ण पापकृत्याची आणि प्रशासकीय अपयशाची अंतिम जबाबदारी राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्यावर येऊन पडते. आरोग्यमंत्र्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, महाराष्ट्राचे आरोग्य सुरक्षित ठेवणे म्हणजे केवळ नवीन आरोग्य योजना जाहीर करणे किंवा मोठ्या उपक्रमांचे उद्घाटन करणे एवढ्यापुरते मर्यादित नाही. तर, आरोग्य यंत्रणेला आतून पोखरणाऱ्या अशा भ्रष्ट कीडयुक्त घटकांचा समूळ उच्चाटन करणे ही देखील त्यांचीच नैतिक आणि प्रशासकीय जबाबदारी आहे. यंत्रणेतील वरिष्ठ अधिकारी जर जनतेच्या रक्ताचा व्यापार करत असतील, तर मंत्रालयात बसून कागदी घोडे नाचवण्याला काहीही अर्थ उरत नाही. सध्या या प्रकरणातील मुख्य आरोपी डॉ. हितेश पगारे आणि अजय भिसे यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले असून, जे. जे. महानगर रक्तपेढी आणि बदलापूरची 'माया' रक्तपेढी सील करण्यात आली आहे. प्राथमिक स्तरावर ही कारवाई योग्य वाटत असली, तरी ती पुरेशी नाही. 'सक्तीची रजा' म्हणजे शिक्षा नव्हे, तर तो तात्पुरता पळवाटा शोधण्याचा मार्ग असू शकतो. हा मानवी रक्ताचा, विश्वासाचा आणि आरोग्याचा द्रोह आहे. अशा हिणकस, अमानुष आणि क्रूर गैरव्यवहारांची व्याधी जर राज्याच्या आरोग्य व्यवस्थेतून कायमची दूर करायची असेल, तर केवळ प्रशासकीय नोटिसा बजावून चालणार नाही. या गुन्हेगारांवर कठोर कलमांखाली फौजदारी गुन्हे दाखल करून, त्यांना तुरुंगाची हवा दाखवायलाच हवी.

जेव्हा अवघ्या देशाचे आराध्य दैवत असलेल्या प्रभू श्रीरामचंद्रांच्या चरणी भाविकांनी अर्पण केलेल्या पैशांचा आणि मौल्यवान वस्तूंचा अपहार करण्यासही काही भ्रष्ट हात धजावत असतील, तिथे मानवी रक्ताचा अपहार करताना कोणाचे हात थरथरतील, ही शक्यताच उरत नाही. म्हणूनच, अशा नराधमांना कायद्याचा असा वचक बसला पाहिजे की, भविष्यात रक्ताच्या एका थेंबाचाही गैरवापर करण्याचा विचार करताना कोणाच्याही अंगावर काटा उभा राहील. आरोग्यमंत्र्यांनी या प्रकरणात वैयक्तिक लक्ष घालून, संपूर्ण राज्यातील रक्तपेढ्यांचे ऑडिट करावे आणि दोषींवर कठोर 'फौजदारी शस्त्रक्रिया' करावी, हीच महाराष्ट्रातील तमाम जनतेची आणि 'दैनीक राष्ट्र सह्याद्री'ची आग्रही मागणी आहे!

# मुख्याधिकारी नसल्याने खुर्चीला हार घालून गांधीगिरी मोकाट कुत्र्यांच्या बंदोबस्ताचे खुर्चीला निवेदन अर्पण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा नगरपंचायतमध्ये सद्या मुख्याधिकारी पदाचा प्रभारी चार्ज राहुरीचे पाटील यांच्या कडे आहे निवेदन घेण्यासाठी ते उपस्थित नसल्याने येथील कार्यकर्त्यांच्या वतीने त्यांच्या खुर्चीला हार घालून गांधीगिरी करण्यात आली.नेवासा शहरात विजेचा होणाऱ्या लपंडावाच्या संदर्भात तसेच मोकाट कुत्र्याचा बंदोबस्त करण्याबाबत मागणीचे निवेदन देण्यासाठी येथील सामाजीक कार्यकर्ते नेवासा नगरपंचायतमध्ये गेले असता तेथे अधिकारीच हजर नसल्याने कार्यकर्त्यांनी नेवासा शहराला कायमस्वरूपी मुख्याधिकारी मिळावा म्हणून खुर्चीला हार घालून व खुर्चीला निवेदन अर्पण करून हे अभिनव आंदोलन केले.

यावेळी मुख्याधिकारी यांच्या खुर्चीला निवेदन अर्पण करण्यात आले.सदर निवेदनात म्हटले आहे की नेवासा शहरातील व परिसरामध्ये मोकाट कुत्रे वाढले आहे, कारवाई करणेबाबत मागील २०२३ ते २०२५ पर्यंत चार निवेदन दिले होते मात्र यावर काही ही कार्यवाही झालेली नाही

नेवासा शहर व परिसरात मागील काही दिवसांपुर्वी पादचाऱ्यांना कुत्र्यांनी चावा घेतला आहे.शाळेमध्ये लहान मुला-मुलींची संख्या जास्त असल्याने शाळा सुटण्याच्या वेळेस किंवा भरण्याच्या वेळेस घरी जाताना व येताना त्या मुलांनाही सदरच्या कुत्र्यांपासुन धोका असल्याने मोकाट कुत्र्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

नेवासा शहरात सतत होणाऱ्या खंडित वीजपुरवठयाला व्यापारी व घरगुती ग्राहक वैतागले असून वीजपुरवठा सुरळीत करण्यात यावा अन्यथा त्रिव आंदोलन करण्यात येईल असा ईशारा वीज वितरण कंपनीचे अधिकारी व मुख्याधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात देण्यात आला आहे.निवेदन खुर्चीला अर्पण करतेवेळी सामाजिक कार्यकर्ते शांताराम गायके, शिवा राजागेरे,विकास चव्हाण,रुपेश उपाध्ये,कुणाल मांडण,बंडू आलवणे,अमोल नहार,गणेश गायकवाड, संजय व्यवहारे,सौरभ मुनोत यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते



# जितेंद्र रणशूर यांचा बनावट जात प्रमाणपत्र रद्द, उपनगराध्यक्षपदही लवकरच जाणार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** कोपरगाव नगरपरिषदेचे विद्यमान उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर यांनी पार पडलेल्या कोपरगाव नगरपरिषदेच्या निवडणुकीत बनावट जात प्रमाणपत्राच्या मदतीने पद मिळविले असून त्यांचे पद रद्द व्हावे याबाबत अहिल्यानगर जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे तक्रार दाखल करण्यात आली होती. सदरच्या तक्रारीची जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दखल घेवून सर्व कागदपत्रांची पडताळणी केली असता जितेंद्र रणशूर यांनी सादर केलेले जात प्रमाणपत्र बनावट असल्याचे दिसून आल्यामुळे उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर यांचे जात प्रमाणपत्र रद्द करण्यात आले असून त्यामुळे त्यांचे उपनगराध्यक्षपदही लवकरच जाणार आहे हा काळे गटाकडून कोल्हे गटाला देण्यात आलेला मोठा झटका मानला जात आहे.



२०२५ मध्ये पार पडलेल्या कोपरगाव नगरपरिषदेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक ९ 'अ' हा प्रभाग एस.सी. प्रवर्गासाठी राखीव असल्यामुळे या प्रभागातून निवडणूक लढवणारा उमेदवार हा एस.सी. प्रवर्गातीलच असणे आवश्यक होते. परंतु या प्रभागातून आपले नाम निर्देशनपत्र भरतांना विद्यमान उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर यांनी आपल्या नाम निर्देशनपत्रात आपल्या जातीचा केलेला उल्लेखच चुकीचा होता. उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर यांनी कोपरगाव नगरपरिषदेच्या निवडणुकीत खोटी माहिती देवून बनावट जात प्रमाणपत्राच्या आधारे निवडणूक लढविली असून त्याबाबतचे सर्व पुरावे व सर्व कागदपत्रांची पूर्तता करून त्यांचे पद रद्द करण्यात यावे अशा आशयाची तक्रार अहिल्यानगर जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे कोपरगाव शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते सागर आहेर यांनी केली होती. त्या तक्रारीची जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने गांभीर्याने दखल घेवून त्याबाबत सर्व कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. वडिलांची जात मुलाच्या दाखल्यावर असते त्यामुळे वडिलांची जात वेगळी आणि मुलाची जात वेगळी असे असु शकत नाही. मात्र जितेंद्र रणशूर यांच्या वडिलांच्या दाखल्यावर वेगळी जात आणि जितेंद्र रणशूर यांच्या दाखल्यावर वेगळी जात असल्याचे मिळालेल्या कागदपत्रातून दिसून आले. त्यामुळे जितेंद्र रणशूर यांनी आपल्या नाम निर्देशनपत्रात आपल्या जातीबाबत खोटी माहिती दिली असल्याचे सिद्ध झाले. त्यामुळे जितेंद्र रणशूर यांनी दिलेला जात प्रमाणपत्र रद्द करण्यात येत असल्याचा निर्णय अहिल्यानगर जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दिला आहे.या निर्णयाचे कोपरगाव शहर राष्ट्रवादी काँग्रेसने स्वागत केले असून सागर आहेर यांच्या वतीने वतीने ॲडव्होकेट मुन्ना सय्यद यांनी प्रभावीपणे बाजू मांडली.

> जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या अध्यक्षा मोनिका सिंह, सदस्य राकेश पाटील आणि सदस्य सचिव अनिल तिदमे यांनी संयुक्तपणे दिलेल्या आदेशानुसार जितेंद्र रणशूर यांनी अनुसूचित जाती प्रमाणपत्राच्या आधारे जे काही शासकीय, निमशासकीय किंवा इतर लाभ मिळवले असतील ते सर्व लाभ कायदेशीररित्या अवैध ठरवून ते वसूलपात्र करण्यात आले आहे. जितेंद्र रणशूर यांचे अनुसूचित जात प्रमाणपत्र उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांना तत्काळ जमा करून घेण्याचे आदेश देखील दिले आहे.
>
> **सागर आहेर**
> **तक्रारदार**

# डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी महाविद्यालयाला फुले कृषी विद्यापीठाकडून 'अ' दर्जा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नगर :** विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन संचलित डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी महाविद्यालय यास महात्मा फुले कृषी विद्यापीठ यांच्या मूल्यांकन प्रक्रियेत मानाचा 'अ' दर्जा प्राप्त झाला आहे. महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन कार्य, विस्तार शिक्षण उपक्रम, पायाभूत सुविधा आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांची ही उल्लेखनीय पोचपावती मानली जात आहे.





महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद मान्यताप्राप्त तसेच महात्मा फुले कृषी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या या महाविद्यालयाने गुणवत्तापूर्ण कृषी शिक्षण, संशोधन आणि विस्तार कार्याच्या माध्यमातून उल्लेखनीय प्रगती साधली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आधुनिक सुविधा, सुसज्ज प्रयोगशाळा, अनुभवी प्राध्यापकवर्ग आणि नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांमुळे महाविद्यालयाने कृषी शिक्षण क्षेत्रात स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या मूल्यांकन समितीने महाविद्यालयातील शैक्षणिक, संशोधन, विस्तार शिक्षण, प्रशासकीय व्यवस्था, पायाभूत सुविधा तसेच विद्यार्थी कल्याणविषयक उपक्रमांचे सखोल मूल्यमापन करून महाविद्यालयास 'अ' दर्जा प्रदान केला आहे. हा दर्जा महाविद्यालयाच्या सातत्यपूर्ण गुणवत्ता वृद्धीचा आणि उत्कृष्ट कार्याचा गौरव असल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. राऊत यांनी सांगितले.

या यशामागे संस्थेचे सचिव डॉ. पी. एम. गायकवाड, संचालक डॉ. अभिजित दिवटे तसेच तंत्र संचालक सुनील कल्हापुरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. भविष्यातही महाविद्यालय शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन आणि कृषी क्षेत्रातील उत्कृष्टता कायम राखत नवे मानदंड प्रस्थापित करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.या यशाबद्दल महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी आणि माजी विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला असून संस्थेच्या प्रगतीमध्ये योगदान देणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले आहेत. महाविद्यालय भविष्यातही कृषी शिक्षण, संशोधन आणि शेतकरी हिताच्या उपक्रमांद्वारे कृषी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे संस्थेने स्पष्ट केले आहे.

# खा. सुप्रियाताई सुळे यांची सानिया मोटर्स शोरूमला भेट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासाफाटा येथील सानिया मोटर्सचे मॅनेजर अनिल जाधव यांच्या संभाजीनगर येथील सानिया मोटर्स फर्मला राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या संसद रत्न खासदार सुप्रियाताई सुळे यांनी सानिया मोटर्स शोरूमला भेट दिली. यावेळी सानिया मोटर्सचे मॅनेजर अनिल जाधव यांनी खासदार सुप्रियाताई सुळे यांचा सत्कार करून शोरूमची सविस्तर माहिती दिली.व्यावसायिक दृष्टिकोनातून खा.सुप्रियाताई सुळे यांनी व्यवस्थापक अनिल जाधव यांच्याशी हितगुज केले.यावेळी अनिल जाधव यांचे बंधू माजी मंत्री शंकरराव गडाख यांचे स्वीय सहायक सुनील जाधव उपस्थित होते



# अश्विनी पुरी यांना 'साई प्रेरणा गौरव पुरस्कार-२०२६'; अलका कुबल यांच्या हस्ते सन्मान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** संगमनेर तालुक्यातील साकूरजवळील बिरेवाडी येथील रहिवासी व प्रसिद्ध निवेदिका अश्विनी पुरी यांना त्यांच्या उत्कृष्ट निवेदन कौशल्याबद्दल 'साई प्रेरणा गौरव पुरस्कार-२०२६' अंतर्गत 'उत्कृष्ट निवेदिका' पुरस्काराने गौरविण्यात आले. ज्येष्ठ मराठी अभिनेत्री अलका कुबल यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या सोहळ्यात अश्विनी पुरी यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रभावीपणे सांभाळले. त्यांच्या ओघवत्या, अभ्यासपूर्ण आणि आत्मीयतेने भरलेल्या निवेदनाने कार्यक्रमाला वेगळी उंची प्राप्त झाली. प्रभावी शब्दफेक, शेरोशायरी आणि प्रेक्षकांशी साधलेला संवाद यामुळे उपस्थितांची त्यांनी मने जिंकली.

कार्यक्रमादरम्यान अभिनेत्री अलका कुबल यांनीही आपल्या मनोगतात अश्विनी पुरी यांच्या सूत्रसंचालनाचे जाहीर कौतुक करत त्यांच्या निवेदनशैलीचे विशेष अभिनंदन केले. ज्येष्ठ अभिनेत्रींकडून मिळालेली ही दाद अश्विनी पुरी यांच्या कारकिर्दीतील महत्त्वाचा टप्पा मानली जात आहे.

पुरस्कार वितरणानंतर अश्विनी पुरी यांनी अलका कुबल यांची विशेष मुलाखत घेतली. या संवादात अलका कुबल यांनी आपल्या अभिनय प्रवासातील संस्मरणीय अनुभव, चित्रपटसृष्टीतील आठवणी आणि जीवनातील प्रेरणादायी प्रसंग मनमोकळेपणाने उलगडले. अश्विनी पुरी यांनी विचारलेल्या अभ्यासपूर्ण व मार्मिक प्रश्नांमुळे ही मुलाखत उपस्थितांसाठी विशेष आकर्षण ठरली. ग्रामीण भागातून पुढे येत राज्यस्तरीय व्यासपीठावर हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळविल्याबद्दल अश्विनी पुरी यांचे साकूर, बिरेवाडी परिसरासह संपूर्ण संगमनेर तालुक्यातून राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन होत आहे.



# देशांतर्गत दळणवळण: रस्ते वाहतूक आणि रेल्वेचे योगदान

देशांतर्गत दळणवळणामध्ये खाजगी मालमोटारींमार्फत होणारी मालवाहतूक मोठ्या प्रमाणात असली, तरी रेल्वेमार्गाने मालगाड्यांद्वारे होणारी वाहतूकही प्रचंड प्रमाणात आहे. रेल्वेमार्गे मालवाहतुकीला अधिकाधिक प्रोत्साहन देण्याचा केंद्र शासनाचा प्रयत्न आहे. जवळच्या अंतरासाठी जलद गतीने वाहतूक करण्यासाठी ट्रक वाहतूक निश्चितच महत्त्वाची आहे; परंतु देशभरातील लांब पल्ल्याच्या मालवाहतुकीसाठी रेल्वे वाहतूक अधिक किफायतशीर ठरते.

देशांतर्गत वाहतूक व्यवस्थेमध्ये रेल्वेला मोठे प्राधान्य आहे. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील दळणवळणासाठी सागरी वाहतूक हा अत्यंत महत्त्वाचा मार्ग असून, त्यासाठी बंदरांचा विकास होणे अधिक आवश्यक आहे.रेल्वेने मालवाहतुकीची क्षमता वाढविण्यासाठी हाय-स्पीड इलेक्ट्रिक रेल्वे इंजिने तयार करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. याअंतर्गत सर्वात शक्तिशाली ९,००० अश्वशक्तीची एकूण १,२०० सुपर इंजिने तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, त्यापैकी सुमारे ४४ इंजिने रुळावर धावू लागली आहेत. या प्रत्येक इंजिनामध्ये सुमारे ४,५०० टन वजनाची मालगाडी ओढून नेण्याची क्षमता आहे. सध्या मालगाड्या सरासरी ६० ते ९० कि.मी. प्रतितास वेगाने धावतात; तर नवीन क्षमतेच्या मालगाड्या १२० कि.मी. प्रतितास वेगाने धावणार आहेत.

प्रवासी वाहतुकीपेक्षा मालगाड्यांद्वारे होणारी मालवाहतूक रेल्वेसाठी आर्थिकदृष्ट्या अधिक फायदेशीर असते. तथापि, प्रवासी वाहतूक अत्यंत महत्त्वाची असल्याने तिला प्राधान्य देणे आणि तिची सुरक्षितता सुनिश्चित करणे आवश्यक आहे. मालवाहतूक वाढण्यासाठी मालाची योग्य हाताळणी आणि वेळेवर वितरण अत्यंत महत्त्वाचे आहे. अनेकदा माल हाताळताना पोती फुटणे, त्यातील माल लंपास होणे किंवा सामानाची मोडतोड होणे अशा घटना घडतात. संबंधितांकडून तक्रारी केल्यानंतर त्याची तत्काळ दखल घेतली जात नाही. तसेच नुकसानभरपाईही वेळेवर मिळत नाही. चोरी करणारा पसार होतो; मात्र त्याची आर्थिक जबाबदारी रेल्वेवर येते. हे रेल्वेचे मोठे नुकसान आहे.

त्याचप्रमाणे, प्रवाशांना इजा झाल्यास, त्यांच्या मालमत्तेची चोरी झाल्यास किंवा सुविधा पुरविण्यात हलगर्जीपणा झाल्यास प्रवासी रेल्वेविरुद्ध नुकसानभरपाईचे दावे दाखल करतात. त्याची भरपाईही रेल्वेलाच करावी लागते. रेल्वे व्यवस्थेतील या त्रुटी दूर झाल्यास रेल्वे प्रवास अधिक सुरक्षित, सुखकर आणि विश्वासार्ह होईल. तसेच मालवाहतूक अधिक जलद व सुरक्षितपणे इच्छित स्थळी पोहोचेल. त्यामुळे नागरिकांचा लाभ होण्याबरोबरच रेल्वेच्या उत्पन्नातही मोठी वाढ होऊ शकते. देशभरात विविध ठिकाणी नवीन रेल्वेमार्ग उभारणे, जुन्या मार्गांचे नूतनीकरण करणे आणि जेथे एकेरी मार्ग आहे तेथे दुहेरी मार्ग उभारण्याचे काम वेगाने सुरू आहे. रेल्वेचा हा सर्वांगीण विकास देशाच्या आर्थिक प्रगतीत आणि राष्ट्रीय उन्नतीत अत्यंत महत्त्वाचे योगदान देणारा ठरत आहे.

नमन
श्री. पद्माकर शिंपी
मो.९४२३७८५८७४

# शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील काही अटी शर्तींचा फेरविचार करावा ; आ. काळेंची विधानसभेत मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** महायुती सरकारने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेचा लाभ जास्तीत जास्त शेतक-यांना व्हावा. त्यासाठी या योजनेतील काही अटी व शर्तींचा फेरविचार करण्यात यावा अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी विधानसभेत केली.





विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पुरवणी मागण्यांच्या चर्चेदरम्यान ते बोलत होते. यावेळी त्यांनी कर्जमुक्ती बरोबरच शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधले. ते म्हणाले, फळबाग फलोद्यान व भाजीपाला उत्पादक सहकारी संस्था या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभासद संस्था आहेत. त्या नियमितपणे पीक कर्ज व कृषी कर्जाचा शेतकऱ्यांना नियमित पुरवठा करीत आहेत. त्यांना कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळावा. या पूर्वीच्या दोन्ही कर्जमाफी योजनांचा लाभ त्यांना झाला आहे. सध्या जेथे पाऊस पडला तेथे पेरणीच्या तोंडावर बाजारपेठेत बियाणे आणि खतांची टंचाई तसेच मोठ्या प्रमाणावर भेसळीच्या तक्रारी येत आहेत. कृषी विभागाने यावर तात्काळ नियंत्रण मिळवून शेतकऱ्यांना वेळेत दर्जेदार बियाणे आणि खते उपलब्ध करून द्यावेत.

कोपरगाव विधानसभा मतदार संघातील मायगाव देवी परिसरातील अनेक शेतकऱ्यांची कांद्याच्या बोगस बियाणांमुळे मोठी आर्थिक फसवणूक झाली. कृषी विभागाकडे रीतसर तक्रार दाखल केल्या. कृषी विभागाने केलेल्या चौकशीमध्ये आरएसआर सिक्स कॉर्पोरेशन या कंपनीने पुरवलेल्या कांद्याच्या बियाणात तब्बल ८६ टक्के भेसळ असल्याचे उघड झाले . याप्रकरणी संबंधित कंपनीवर गुन्हा दाखल करण्यात आला. या कंपनीचा परवाना कायमचा रद्द करावा आणि कंपनीचे संचालक व दोषी अधिकाऱ्यांवर कडक फौजदारी कारवाई करावी. व मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद योजने अंतर्गत कोपरगाव मतदार संघासाठी ५ कोटी निधी दिल्याबद्दल महायुती शासनाचे आपण आभार मानीत आहोत.

> कोपरगाव विधानसभा मतदार संघातील शेतकरी केंद्रस्थानी ठेवून त्यांचे प्रश्न सोडविणे हे माझे आद्य कर्तव्य आहे. जास्तीत जास्त शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळावा हि माझी प्रामाणिक इच्छा आहे. अडचणीच्या वेळी शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे महायुती सरकार मी मांडलेले सर्व विषय निश्चितपणे मार्गी लावेल असा मला विश्वास आहे. –
>
> **आमदार आशुतोष काळे.**

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# वटसावित्री पौर्णिमेनिमित्त संगमनेर तालुक्यात ११०० वटवृक्षांचे रोपण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : वटसावित्री पौर्णिमेच्या निमित्ताने लोकनेते बाळासाहेब थोरात आणि माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या दंडकारण्य अभियानांतर्गत संगमनेर तालुक्यात यंदा ११०० वटवृक्षांचे रोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात तालुक्यातील प्रत्येक गाव तसेच वाडी-वस्त्यांवर वटवृक्षांची लागवड करण्यात आली. खांडगाव येथे झालेल्या मुख्य कार्यक्रमाला माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे आणि युवक काँग्रेसच्या अध्यक्षा व कॅन्सरतज्ज्ञ डॉ. जयश्रीताई थोरात प्रमुख उपस्थित होत्या. यावेळी शेकडो महिलांनी वटवृक्षांचे पूजन करून निसर्ग संवर्धनाची सामूहिक शपथ घेतली. उपस्थित महिलांनी निसर्गगीतांच्या माध्यमातून वटपौर्णिमा उत्साहात साजरी केली.

यावेळी बोलताना दुर्गाताई तांबे म्हणाल्या की, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या दंडकारण्य अभियानाचा तालुक्यात मोठा विस्तार झाला असून नागरिकांचाही त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. वड, पिंपळ, उंबर, आंबा, कडूनिंब आणि चिंच यांसारखे देववृक्ष मोठ्या प्रमाणात ऑक्सिजन देतात. त्यामुळे पुढील पिढ्यांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी या वृक्षांचे रोपण व संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे. डॉ.



जयश्रीताई थोरात यांनी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने किमान दोन झाडे लावून त्यांचे संगोपन करण्याचे आवाहन केले. कोरोना काळात ऑक्सिजनचे महत्त्व सर्वांना समजले, मात्र कालांतराने त्याचा विसर पडल्याचे सांगत त्यांनी वाढते तापमान, अनियमित पाऊस आणि ग्लोबल वॉर्मिंगसारख्या समस्यांवर मात करण्यासाठी वृक्षसंवर्धन हाच प्रभावी उपाय असल्याचे स्पष्ट केले.

निरोगी जीवनासाठी चांगले पर्यावरण, संतुलित आहार आणि नियमित व्यायाम यांचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले. या उपक्रमात अर्चनाताई बालोडे, कमल आरगडे, लक्ष्मीबाई गुंजाळ, वंदना गुंजाळ, अरुणा गुंजाळ, संगीता गुंजाळ, शाहिदा शेख, सुरेखा खरे, आशा सिनारे यांच्यासह तालुक्यातील विविध गावांतील महिला पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले. पर्यावरण रक्षणाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे सर्वत्र स्वागत करण्यात आले.

## दखल

### बोर्डेक्स मिक्सचर प्रात्यक्षिक कृषिकन्यांचा उपक्रम



**चांदा** : महात्मा फुले कृषी विद्यापीठ अंतर्गत मुळा एज्युकेशन सोसायटीचे सोनई येथील कृषि महाविद्यालयातील कृषिकन्यांनी ग्रामीण जागरूकता व कृषि कार्यानुभव अंतर्गत नेवासा तालुक्यातील बऱ्हाणपूर या गावाला भेट दिली. व बोर्डेक्स मिक्सचर बनविण्याचे प्रात्यक्षिक सादर केले. बोर्डेक्स मिक्चरचे फायदे शेतकऱ्यांना पुढील प्रमाणे सांगितले बुरशीजन्य रोगावर प्रभावी नियंत्रण करपा डाग तसेच इत्यादी रोगावर प्रभावी ठरते संरक्षक बुरशीनाशक, रोग होण्यापूर्वी फवारणी केल्यास रोगाचा प्रादुर्भाव कमी होतो ,तांबेयुक्त बुरशीनाशक - पिकांना दीर्घकाळ संरक्षण मिळते तसेच आंबा डाळिंब लिंबू युक्तवर्गीय फळे अनेक भाजीपाला पिकांमध्ये याचा वापर केला जातो. या वेळी कृषी कन्या पोर्णिमा काळभोर, साक्षी भांबुरे , प्रतीक्षा गोडसे, आर्द्रा नायर, हिमांशी गवळी यांनी उपस्थित शेतकऱ्या समोर बोर्डे पिक्चर चे प्रात्यक्षिक सादर केले. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरी मोरे, उपप्राचार्य सुनील बोरुडे, कार्यक्रम समन्वयक अनुप दरंदले, कार्यक्रम अधिकारी प्रा. दिशा चव्हाण, प्रा.नरेंद्र दहातोंडे , डॉ .संतोष चौगुले व विषय विशेषज्ञ प्रा.आर.पी.भोसले यांचे कृषी कन्यांना विशेष मार्गदर्शन लाभले. यावेळी बऱ्हाणपूर येथील अनेक शेतकरी उपस्थित होते.

### जुळ्या बहिणींचे सीए परीक्षेत यश



**झरेकाठी** : शेळके परिवारातील जुळ्या भगिनींचे सीए परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवल्याबद्दल जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. शिर्डी मतदारसंघातील शेळके परिवारातील जुळ्या भगिनी अपूर्वा आणि दूर्वा प्रदीप शेळके यांनी चार्टर्ड अकाउंटंट (उ-) परीक्षेत मिळवलेल्या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचे मंत्री विखे पाटील यांनी सत्कार करून अभिनंदन केले. सीए ही अत्यंत प्रतिष्ठेची आणि कठीण परीक्षा मानली जाते. अशा परीक्षेत दोन्ही भगिनींनी आपल्या अथक परिश्रम, जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या बळावर मिळवलेले यश निश्चितच कौतुकास्पद असून, संपूर्ण शिर्डी मतदारसंघासाठी अभिमानाची बाब आहे. यशासाठी चिकाटी, मेहनत आणि आत्मविश्वास किती महत्त्वाचा असतो, याचे उत्तम उदाहरण अपूर्वा आणि दूर्वा यांनी आपल्या कर्तृत्वातून घालून दिले आहे. त्यांचे हे यश अनेक विद्यार्थ्यांना मोठी प्रेरणा देणारे ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

### भारतीय जनता युवा मोर्चा जिल्हा सचिवपदी श्रीराज थोरात



**संगमनेर** : भारतीय जनता युवा मोर्चाच्या उत्तर नगर जिल्हा सचिव पदी येथील भाजपचे श्रीराज रवींद्र थोरात यांची निवड करण्यात आली आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे, भाजयुमोचे प्रदेश प्रभारी सुनील राणे व प्रदेश अध्यक्ष कृष्णराज महाडिक भाजप उत्तर नगर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप युवा मोर्चाचे उत्तर नगर जिल्हाध्यक्ष रोहित राजेश चौधरी यांनी नुकतीच भाजपा युवा मोर्चा उत्तरनगर जिल्हा कार्यकारिणी जाहीर केली आहे. त्यात जिल्हासचिव पदाची जबाबदारी श्रीराज रवींद्र थोरात यांच्यावरती सोपविण्यात आली आहे. आपल्यावर भाजप युवा मोर्चा उत्तर नगर जिल्हा सचिव पदाची जबाबदारी वरिष्ठांनी टाकली आहे त्या माध्यमातून भाजप युवा मोर्चाचे उत्तर नगर जिल्ह्यामध्ये ताकद वाढविण्यासाठी प्रयत्न करेल असे नूतन जिल्हा सचिव श्रीराज थोरात यांनी सांगितले.

# बदलत्या हवामानात शेतीचे योग्य नियोजन गरजेचे : कुलगुरू डॉ. विलास खर्चे



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : बदलते हवामान, अनिश्चित पाऊसमान आणि मान्सूनच्या बदलत्या स्वरूपाचा विचार करून शाश्वत, खात्रीशीर व हवामानाधारित शेती पद्धतीचा अवलंब करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी केले. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी आणि महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत ताहराबाद (ता. राहुरी) येथील पिंपळेश्वर महादेव मंदिर परिसरात आयोजित बाजरी उत्पादन तंत्रज्ञान कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी 'खेत बचाओ अभियान-२०२६' या भित्तिपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांनी बाजरी व नाचणीसारख्या पौष्टिक तृणधान्यांचे महत्त्व सांगत त्यांच्या लागवडीचे आवाहन केले. डॉ. दत्तात्रय पाचरणे यांनी बाजरी लागवडीतील वाण निवड, बीजप्रक्रिया, संतुलित खतांचा वापर, आंतरमशागत व पीक संरक्षण या पंचसूत्रीबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला डॉ. पंडित खर्डे, डॉ. सुनील आडांगळे, डॉ. सचिन सदाफळ, डॉ. योगेश बन, अशोक हारदे, बापूसाहेब शिंदे, सरपंच निवृत्ती घनदाट यांच्यासह १५० हून अधिक शेतकरी उपस्थित होते. सूत्रसंचालन शिवाजी झावरे यांनी, तर आभार डॉ. सुनील आडांगळे यांनी मानले. ताहराबाद गावात प्रथमच कुलगुरू डॉ. विलास खर्चे आले होते. योगायोगाने कार्यक्रमाच्या दिवशी त्यांचा वाढदिवस असल्याने आणि सुट्टीच्या दिवशीही ते शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन करत असल्याबद्दल उपस्थित शेतकऱ्यांनी त्यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

# पक्षभेद न करता सर्वसामान्यांच्या विकासासाठी कटिबद्ध : आ. खताळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : राजकारण हे केवळ निवडणुकांपुरते मर्यादित नसून, निवडणुका संपल्यानंतर जनतेची कामे करणे ही लोकप्रतिनिधींची खरी जबाबदारी आहे. एकमेकांची जिरवाजिरवी करण्यापेक्षा सर्वसामान्यांच्या विकासाला प्राधान्य देत तालुक्यात कोणताही राजकीय पक्षभेद न करता प्रत्येक नागरिकाचे काम करण्याचा प्रयत्न केला जात आहे. हक्काचा लोकप्रतिनिधी असेल, तेव्हाच गावाचा आणि परिसराचा सर्वांगीण विकास होतो, असे प्रतिपादन आमदार अमोल खताळ यांनी केले.




तालुक्यातील सुकेवाडी (पावबाकी) येथील गवळी बाबा चौक परिसरात विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण आमदार खताळ यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उत्तम कुटे, नामदेव सातपुते, कान्होजी राऊत, काशिनाथ सातपुते, माजी सरपंच गोरख सातपुते, सूर्यभान नवले, भारत शिंदे, बाळासाहेब शिरसाठ, शरद पानसरे, रणजीत जाधव, अकील शेख, पोपट सातपुते, भैय्या सातपुते, युवराज सातपुते, गोविंद सातपुते, रवींद्र सातपुते, अरुण शेटे, गंगाधर सातपुते, नितीन सातपुते, गणेश गुंजाळ, सागर सातपुते, नितीन शिंदे, उपअभियंता हेमंत चव्हाण यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामीण भागातील रस्त्यांचा प्रश्न सोडविण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू असून शेतरस्ते आणि भावकीच्या वादामुळे रखडलेली कामे मार्गी लावली जात आहेत.

चुकीच्या नोंदीमुळे एका रस्त्याचा निधी अन्यत्र वळवला गेला असला तरी तो रस्ता सुकेवाडीचाच असून त्यासाठी स्वतंत्रपणे दहा लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी घोषणा त्यांनी केली. तसेच प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून सुकेवाडीसाठी आणखी एका रस्त्याचा समावेश करण्याचेही त्यांनी जाहीर केले.

# प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या केमिकल विभागाची शंभर टक्के प्लेसमेंट



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : लोणी येथील लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या केमिकल इंजिनिअरिंग विभागाने २०२६ च्या बॅचमध्ये शंभर टक्के प्लेसमेंटचा मानाचा टप्पा गाठला आहे.

विभागातील सर्व ४२ विद्यार्थ्यांची देशातील नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. घरडा केमिकल, लुपिन, एमक्युअर, मॅक्लिऑड्स, सिप्ला, आरती फार्मा, सन फार्मास्युटिकल्स आदी आघाडीच्या कंपन्यांनी विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी दिली आहे. महाविद्यालयाने नुकताच स्वायत्त दर्जा मिळविल्याबरोबरच एनबीए व नॅक मानांकनही प्राप्त केले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार उद्योगाभिमुख शिक्षण, कौशल्य विकास, मॉक इंटरव्ह्यू, इंटर्नशिप, औद्योगिक भेटी व संशोधनावर विशेष भर दिला जात असल्याने विद्यार्थ्यांना रोजगाराच्या उत्कृष्ट संधी उपलब्ध होत आहेत.

विभागप्रमुख डॉ. सुनील मिसाळ यांनी या यशाचे श्रेय अनुभवी प्राध्यापक, आधुनिक प्रयोगशाळा, उद्योगांशी असलेली संलग्नता आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षणपद्धतीला दिले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे व प्राध्यापकांचे अभिनंदन केले.

# चांगदेवनगरमध्ये 'पल्स पोलिओ' मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**पुणतांबा** : देशभरात राबविल्या जाणाऱ्या पल्स पोलिओ मोहिमे अंतर्गत राहाता तालुक्यातील पुणतांबा-चांगदेवनगर येथील उपकेंद्र (सरकारी दवाखाना) येथे लहान बालकांना पोलिओचे डोस देण्यात आले. या मोहिमेला गावातील पालकांनी व बालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या विशेष कार्यक्रमाचे उद्घाटन आणि बालकांना पोलिओ डोस देण्याचा शुभारंभ गावातील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी बोलताना मान्यवरांनी, एकही बालक पोलिओ डोसपासून वंचित राहणार नाही, याची काळजी सर्वांनी घ्यावी, असे आवाहन केले. तसेच आरोग्य विभागाच्या या राष्ट्रव्यापी कामाचे कौतुक केले. या कार्यक्रमा प्रसंगी ग्रामपंचायतीचे प्रतिष्ठित सदस्य अनिलराव नळे, भूषणराव वाघ, तसेच रामचंद्र पवार आणि अक्षय सोमवंशी आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. त्यांनी आरोग्य केंद्राला भेट देऊन मोहिमेच्या नियोजनाविरूद्ध समाधान व्यक्त केले. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी चांगदेवनगर उपकेंद्राच्या परिचारिका गोऱ्हे सिस्टर आणि आशा सेविका शिरसाठ यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांनी परिसरातील प्रत्येक बालकाला डोस मिळेल याची खात्री करत मोहिमेचे उत्तम नियोजन केले.याप्रसंगी गावातील इतरही अनेक मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रवरासंगम येथे रिपब्लिकन सेनेच्या शाखेचे उद्घाटन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : तालुक्यातील प्रवरासंगम येथे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या रिपब्लिकन सेनेच्या पहिल्या शाखेचे उद्घाटन प्रदेशाध्यक्ष सुशील सूर्यवंशी यांच्या हस्ते व संभाजी जिल्हाध्यक्ष काकासाहेब गायकवाड, उत्तर जिल्हाध्यक्ष चरण त्रिभुवन,युवा जिल्हाध्यक्ष सोमनाथ साठे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी बहुजन समाज पार्टीचे नेवासा तालुका अध्यक्ष हरिष चक्रनारायण यांचा प्रदेशाध्यक्ष डॉ. सुशील कुमार सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत रिपब्लिकन सेनेमध्ये जाहीर प्रवेश करण्यात आला.

प्रदेशाध्यक्ष डॉ. सुशील सूर्यवंशी म्हणाले, अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरणाला रिपब्लिकन सेनेचा ठाम विरोध असून उपवर्गीकरणामुळे होणारे तोटे सविस्तरपणे मांडताना त्यांनी सांगितले की, सेनानी आनंदराज आंबेडकर हे कोणत्याही जातीच्या विरोधात नसून मनुवादी प्रवृत्तीच्या विरोधात संघर्ष करत आहेत.

अनुसूचित जातीतील ५९ जातींचे विभाजन होऊ देणार नाही, त्यांना एकसंघ ठेवणे हीच पक्षाची भूमिका असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. संभाजीनगर जिल्हाध्यक्ष काकासाहेब गायकवाड यांनी तरुणांनी मोठ्या संख्येने पक्षात सहभागी होऊन महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेचा प्रसार करावा, असे आवाहन केले. तसेच बेरोजगार तरुणांसाठी लाखो रुपयांच्या कर्ज योजनांचा पाठपुरावा करून त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी पक्ष प्रयत्नशील राहील असे आश्वासन दिले. अहमदनगर उत्तर जिल्हाध्यक्ष चरणदादा त्रिभुवन यांनी आपल्या भाषणात सांगितले की, अहमदनगर उत्तर जिल्ह्यातील प्रत्येक तालुर पक्षसंघटना अधिक मजबूत करण्यात येईल आणि प्रत्येक कार्यकर्त्याला पक्षाची पूर्ण ताकद दिली जाईल अशी ग्वाही बोलतांना दिली या कार्यक्रमात प्रवरा संगम शाखेचे उदघाटन करून रविंद्र पारखे यांची शाखाध्यक्षपदी तर बाळासाहेब पवार यांची उपाध्यक्षपदी नियुक्त करण्यात आली.

कार्यक्रमास प्रदेशाध्यक्ष डॉ सुशील कुमार सूर्यवंशी, जिल्हाध्यक्ष काकासाहेब गायकवाड, अहमदनगर उत्तर जिल्हाध्यक्ष चरणदादा त्रिभुवन,उत्तर जिल्हा प्रवक्ते शिवा साठे,ठोकळ गंगापूर तालुकाध्यक्ष अमोल कानडे,उत्तर युवा जिल्हाध्यक्ष सोमनाथ साठे, नेवासा तालुकाध्यक्ष हरीश चक्रनारायण, संतोष साठे, गणेश पारखे, मच्छिंद्र पारखे, कासूदे,नितीन भालेराव, संतोष मोरे पोपटराव चाबुकस्वार यांच्यासह अनेक पदाधिकारी मान्यवर आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आठ वर्षांच्या संशोधनाला यश

## शेतकरी लावरे यांच्या तीन पिकांच्या नवीन वाणांची राष्ट्रीय स्तरावर नोंद

सोमनाथ डोळे । राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी** : ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारी कामगिरी करत शेतकरी संशोधक बाळासाहेब लावरे यांनी स्वतः विकसित केलेल्या तूर, वांगी आणि भोपळा या तीन गावरान पिकांच्या नवीन वाणांची नवी दिल्ली येथील कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाकडे यशस्वी नोंदणी केली आहे.

तब्बल आठ वर्षांच्या सातत्यपूर्ण संशोधनानंतर या वाणांना राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाल्याने स्थानिक गावरान वाणांच्या संवर्धनाला मोठी चालना मिळणार आहे. वाढत्या रासायनिक शेतीमुळे मानवी आरोग्यावर होणारे परिणाम लक्षात घेऊन गावरान वाणांचे जतन आणि गुणवत्तापूर्ण उत्पादन मिळावे,



या उद्देशाने लावरे यांनी दीर्घकाळ संशोधन केले. त्यातून तूर - सिंधू, वांगी - परीगा आणि भोपळा - सोहम या तीन नवीन वाणांची निर्मिती झाली. सिंधू तूर हा कमी कालावधीत तयार होणारा वाण असून त्याला नारंगी रंगाची फुले येतात. त्याचे दाणे जांभळ्या रंगाचे, दर्जेदार व चवीला रुचकर आहेत. या तुरीची डाळ खाल्ल्याने पित्ताचा त्रास होत नसल्याचा दावा लावरे यांनी केला आहे. परीगा वांगी या वाणाचे वैशिष्ट्य म्हणजे फळाच्या देठाला, पानांना व फांद्यांना अजिबात काटे नसतात.

गोल आकाराची फळे, देठाला सात पाकळ्या आणि उत्कृष्ट चव ही या वाणाची ओळख आहे. सोहम भोपळा या वाणावर हिरव्या रंगाचे आकर्षक पट्टे असून तो चवीला स्वादिष्ट आहे. या भोपळ्याचे सेवन केल्यास रक्तदाब नियंत्रणास मदत होत असल्याचे लावरे यांचे म्हणणे आहे. याशिवाय लावरे यांनी जांभळी चवळी, काळी उलटी मिरची तसेच गावरान दोन दाणी भुईमुगातून तीन दाणी भुईमुग विकसित करण्याचेही संशोधन केले आहे. शेतकरी वाणांची नोंदणी झाल्यानंतर त्या वाणावरील सर्व हक्क संबंधित शेतकऱ्याला मिळतात.

बीजोत्पादन, ब्रँडच्या माध्यमातून विक्री, आयात-निर्यात तसेच बेकायदेशीर वापर झाल्यास कायदेशीर कारवाई करण्याचा अधिकारही प्राप्त होतो. शेतकरी संशोधक बाळासाहेब लावरे यांच्या या यशामुळे गावरान वाणांचे संवर्धन, शेतकरी संशोधनाला प्रोत्साहन आणि ग्रामीण भागातील नवकल्पक शेतकऱ्यांना प्रेरणा मिळणार असल्याची भावना कृषी क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

# ग्रामस्थांच्या प्रश्नांच्या भडिमाराने डिग्रस ग्रामपंचायतीची ग्रामसभा ठरली वादळी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुक्यातील डिग्रस ग्रामपंचायतीची विशेष ग्रामसभा ग्रामस्थांनी विविध प्रश्नांवर केलेल्या भडिमारामुळे चांगलीच गाजली. अनेक विषयांवर तीव्र चर्चा, तक्रारी आणि तंटामुक्त समितीच्या अध्यक्ष निवडीवरून झालेल्या वादामुळे ग्रामसभा वादळी ठरली. ग्रामपंचायत कार्यालयाच्या प्रांगणात झालेल्या या सभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच रेणुका गावडे होत्या.



उपसरपंच रावसाहेब पवार यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, अधिकारी आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. सभेत बारागाव नांदूर योजनेअंतर्गत नवीन कामांचे प्रस्ताव, प्रधानमंत्री आवास योजना, घरपट्टी, पाणीपट्टी, १५ वा वित्त आयोग, तंटामुक्त समितीची स्थापना तसेच शासकीय योजनांचा आढावा या विषयांवर चर्चा करण्यात आली.

मात्र चर्चेदरम्यान ग्रामस्थांनी अपूर्ण विकासकामे, घरकुल योजना, पाणीपुरवठा, आरोग्य सेवा आणि विविध तक्रारींवर पदाधिकाऱ्यांना धारेवर धरले. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कामकाजाबाबत उपस्थित वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे ग्रामस्थांनी अनेक प्रश्न उपस्थित केले.

मात्र समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त करत आरोग्य सुविधांबाबत संताप व्यक्त केला. तसेच पूर्वी मंजूर झालेल्या घरकुलांचे लाभार्थी सध्या वास्तव्यास आहेत का, याची चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली. रामवाडी, शोलेवाडी, भीमनगर आणि कोयबामाळ येथील नागरिकांनीही विविध समस्या मांडत ग्रामपंचायत प्रशासनाविषयी नाराजी व्यक्त केली. सभेचा मुख्य विषय असलेल्या तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदासाठी तब्बल १२ इच्छुकांनी नावे दाखल केली.

अध्यक्ष निवडीबाबत एकमत न झाल्याने अखेर १५ ऑगस्ट रोजी मतदान घेऊन अध्यक्षाची निवड करावी, अशी ग्रामस्थांनी मागणी केली. त्यानंतर ग्रामसभा आटोपती घेण्यात आली. विशेष म्हणजे, यापूर्वीच्या ग्रामसभांमध्ये कोरम पूर्ण होत नसताना यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित राहिल्याने गावात याची विशेष चर्चा रंगली.

## पान १ वरुन

### १३ वर्षांचा 'महसूल घोटाळा' उघड

बंधनकारक आहे. हा २० टक्क्यांचा नियम टाळण्यासाठी विकासक (बिल्डर्स) आणि अधिकाऱ्यांनी मिळून मोठा घोटाळा केला. उदाहरणार्थ, ७ एकरच्या जमिनीचे कागदोपत्री ७ तुकडे पाडले गेले. वेगवेगळे खोटे नकाशे दाखवून २० टक्क्यांच्या आरक्षणातून बेकायदेशीर सूट मिळवली गेली. एकूण ४९ प्रकरणांमध्ये असे बनावट फेरफार आणि हिस्से तयार करून गरिबांची घरे लाटण्यात आली. हा घोटाळा म्हाडा, नाशिक टाऊन प्लॅनिंग आणि भूमी अभिलेख या तिन्ही विभागांतील अधिकाऱ्यांनी मिळून अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने केला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, भूमी अभिलेख विभागाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने केवळ हा घोटाळा करण्यासाठीच नोकरीतून स्वेच्छानिवृत्ती (रिटायरमेंट) घेतली. त्यानंतर तो या घोटाळ्याचा मुख्य कन्सल्टंट बनला आणि त्याने नोकरीतून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा ५० पट अधिक पैसा यात कमावला. हा अधिकारी परदेशात पळून गेला होता, मात्र महसूल विभागाने त्याला विदेशातून पकडून आणले आणि दीड महिना जेलमध्ये ठेवून त्याची कसून चौकशी केली.

### कर्जमाफी जुलैच्या दुसऱ्या आठवड्यात!

जुलैच्या दुसऱ्या आठवड्यात शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा होईल. विधानसभेत विरोधकांनी योजनेतील कठोर अटींमुळे लाखो शेतकरी वंचित राहण्याची शक्यता व्यक्त केली. त्यावर उत्तर देताना भरणे यांनी सांगितले की, प्राथमिक अंदाजानुसार राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना तब्बल ₹३६,५८५ कोटींची कर्जमाफी देण्यात येणार आहे. सदस्यांनी मांडलेल्या सूचनांनुसार आणि मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार योजनेतील अटी व निकषांमध्ये आवश्यक बदल करण्यात येणार असून, अधिकाधिक पात्र शेतकऱ्यांना लाभ मिळेल याची काळजी सरकार घेईल. आम्हीही शेतकऱ्यांची लेकरं आहोत. संकटात सापडलेल्या शेतकऱ्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हे सरकारचे कर्तव्य आहे. हवामानातील अनिश्चितता, अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट यामुळे शेतकरी अडचणीत आला आहे. गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही सरकार शेतकऱ्यांना मदत करेल, असा विश्वास कृषिमंत्र्यांनी व्यक्त केला. राज्य सरकारच्या या योजनेअंतर्गत २ लाख रुपयांपर्यंतचे पीककर्ज माफ करण्यात येणार असून, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ₹५० हजारांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्याची घोषणाही कायम ठेवण्यात आली आहे. खरीप हंगामाच्या तोंडावर जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून कर्जमाफीची अंमलबजावणी सुरू होणार असल्याने राज्यातील लाखो शेतकरी कुटुंबांना मोठा आर्थिक दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### फडणवीसांचा पत्ता कट करण्याचे कारस्थान

राजकारण राबविले जात असून, लोकशाहीला हा गंभीर धोका असल्याचा आरोप त्यांनी केला. ठाकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या राजकीय संबंधांवर भाष्य करत, महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष आता भाजप आणि शिंदे गटापुरता मर्यादित नसून तो भविष्यातील राष्ट्रीय नेतृत्वाच्या स्पर्धेशी जोडला गेला असल्याचा दावा केला. दरम्यान, खासदार संजय राऊत यांनीही भाऊसाहेब वाकचौरे यांच्यावर टीकास्त्र सोडत, गद्दारी करणाऱ्यांना जनता कधीच माफ करणार नाही, असा इशारा दिला.

### विनाअट सरसकट कर्जमाफीसाठी भरपावसात अन्नदात्याचा एल्गार!

आश्वासन पाळले नसल्याने रोहित पवारांनी पुन्हा एकदा राज्यभराचा जनदौरा सुरू केला. या मराठवाडा दौऱ्याचा शेवट सोमवारी छत्रपती संभाजीनगरच्या केंब्रिज चौकातील ऐतिहासिक रास्ता रोको आंदोलनाने झाला. सकाळी साडेअकरा वाजेच्या सुमारास सर्व प्रमुख नेत्यांनी चौकात कूच करत रस्ता अडवून धरणे आंदोलन सुरू केले. हे आंदोलन दुपारी दोन वाजेपर्यंत चालू होते.

### नसरापूर प्रकरणातील आरोपीला मृत्युदडाची शिक्षा

देताना सर्वोच्च न्यायालयाने निश्चित केलेले निकष विचारात घेणे आवश्यक असते. त्यामध्ये गुन्ह्याचे अत्यंत क्रूर स्वरूप, न्यायालयाच्या विवेकबुद्धीला धक्का देणारी घटना, आरोपी समाजासाठी कायमचा धोका ठरण्याची शक्यता, पीडित व्यक्ती पूर्णपणे असहाय असणे आणि कोणत्याही चिथावणीशिवाय गुन्हा करण्यात आलेला असणे या बाबींचा समावेश आहे. सदर प्रकरणात हे सर्व निकष लागू होत असल्याचे न्यायालयाने नमूद केले. तसेच आरोपीच्या बाजूने शिक्षा कमी करण्यास कारणीभूत ठरेल अशी कोणतीही परिस्थिती आढळून आली नसल्याचे निरीक्षणही न्यायालयाने नोंदविले. त्यामुळे हे प्रकरण 'दुर्मिळातील दुर्मिळ' स्वरूपाचे असल्याचा निष्कर्ष काढत आरोपीला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. या निर्णयाचे राज्यभरातून स्वागत होत असून, महिलांवरील व बालकांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये कठोर शिक्षा देण्याचा ठोस संदेश या निकालातून गेला असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

# एप्रिल मे महिन्यातील नुकसानीपोटी शेतकऱ्यांना १.८० कोटी नुकसान भरपाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** कोपरगाव तालुक्यात एप्रिल व मे महिन्यात अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. त्याबाबत तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना करून नुकसानीचा अहवाल सादर करण्याचे आदेश महसूल व कृषी विभागाला दिले होते. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळावी यासाठी केलेल्या पाठपुराव्यातून महायुती शासनाने कोपरगाव तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना १.८० कोटी नुकसानभरपाई जाहीर केली असल्याची माहिती आमदार आशुतोष काळे यांनी दिली आहे.

नैसर्गिक संकट शेतकऱ्यांच्या पाचवीलाच पुजली असून एपिल व मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे कोपरगाव तालुक्यातील अनेक गावातील शेतकऱ्यांना त्याचा फटका बसला होता. या अवकाळी पावसामुळे अनेक शेतात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यामुळे शेकडो हेक्टरवरील काढणीला आलेल्या पिकांसह डाळिंब, टरबूज आदीसह फळबागांचे, चारा पिकांचे आणि कांदा काढून झाकून ठेवलेल्या कांदा पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. त्यामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेला शेतकरी आणखी आर्थिक अडचणीत सापडला होता.

शेतकरी आलेल्या नैसर्गिक संकटाला न घाबरता नेहमीच मोठ्या हिमतीने उभा राहिला आहे.त्यामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळावी यासाठी तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत कशी मिळविता येईल यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरु होता. त्या पाठपुराव्याची दखल घेवून महायुती शासनाने कोपरगाव तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना १.८० कोटी नुकसान भरपाई रक्कम मंजूर



केली आहे. त्यामुळे निश्चितच शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून खरीप हंगामाच्या तयारीसाठी मदत होणार आहे.

पावसाने जरी उशीर केला असेल मात्र महायुती शासनाने या कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांना बळ देण्याचे आपले काम चोखपणे बजावले आहे. ऐन अडचणीच्या काळात खरिपाच्या पेरणीसाठी आवश्यक असलेले आर्थिक भांडवल आमदार आशुतोष काळे यांच्या अथक प्रयत्नातून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना उपलब्ध होणार असल्यामुळे कोपरगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी आमदार आशुतोष काळे यांचे आभार मानले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना १.८० कोटी नुकसान भरपाई रक्कम मंजूर केल्याबदल कोपरगाव तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या वतीने आमदार आशुतोष काळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.श्रीम.सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री ना.एकनाथजी शिंदे, कृषी मंत्री ना.दत्तामामा भरणे,मदत व पुनर्वसन मंत्री ना. मकरंदजी जाधव पाटील, पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पा.यांचे कोपरगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या वतीने आभार मानले आहे.

# गृहनिर्माण अभियंता लाच घेताना रंगहात पकडला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** पंतप्रधान घरकुल आवास योजने अंतर्गत मंजूर झालेल्या घरकुलचा दुसरा हप्ता काढून देण्यासाठी कामाची स्थळ पाहणी करण्यासाठी वैजापूर पंचायत समितीत कार्यरत ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्याला एक हजारांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. वैजापुर तालुक्यातील

प्रवीण गायकवाड वय ३५ वर्षे रा. पानवी ता.वैजापूर ग्रामीण गृहनिर्माण अभियंता डवाळा खंबाळा असे लाच स्वीकारणाऱ्या अभियंत्याचे नाव आहे.या प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस निरीक्षक शांतीलाल चव्हाण यांनी वैजापूर पोलिसांत फिर्याद दाखल केली आहे.त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार ३१ वर्षीय तक्रारदाराला पंतप्रधान घरकुल आवास योजनेतून घरकुल मंजूर झाले होते.त्याचा पहिला हप्ता त्यांना मिळाला होता मात्र दुसरा हप्ता मिळवण्यासाठी तक्रारदार यांनी आरोपी अभियंता यांच्याकडे वारंवार कॉल करून स्थळ पाहणी करून जीओ टॅग करून त्याचे फोटो अपलोड करण्यासाठी सांगितले.मात्र यातील आरोपी अभियंता याने तक्रारदार यांच्याकडे



दुसरा हप्ता काढून देण्यासाठी एक हजार रुपयांची मागणी केली.परंतु तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी छत्रपती संभाजीनगर येथे लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडे तक्रार केली. तक्रारीच्या अनुषंगाने लाच मागणी पडताळणी केली असता यातील अभियंता प्रवीण गायकवाड यांनी तक्रारदार यांच्या घरकुलच्या दुसऱ्या हप्त्याचे ७५ हजारांचे बिल काढण्यासाठी १ हजार रुपयांची मागणी केली.पडताळणी नंतर लाचलुचपत प्रतिबंध विभागाने सोमवार(ता.२९)रोजी सापळा रचला,दरम्यान पंचायत समिती कार्यालयात तक्रारदार यांच्याकडून अभियंता प्रवीण गायकवाड याने १ हजार रुपयांची लाच स्वीकारली.लाच स्वीकारल्यानंतर पथकाने प्रवीण गायकवाड याला पंचा समक्ष ताब्यात घेतले. त्याच्या ताब्यातून स्वीकारलेली १ हजार रुपयांची लाचेची रक्कम व अन्य ४५० रोख रक्कम व दोन मोबाईल पोलिसांनी जप्त केले.या प्रकरणात घरकुलचा हप्ता काढून देण्यासाठी १ हजारांची लाच स्वीकारल्या प्रकरणी प्रवीण गायकवाड याच्या विरोधात पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदरची कारवाई ही लाचलुचपत प्रतिबंध विभाच्या पोलिस अधीक्षक माधुरी कांगणे,अप्पर पोलिस अधीक्षक शशिकांत सिंगारे,पोलिस उपअधीक्षक प्रशांत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी निरीक्षक शांतीलाल चव्हाण,पोलिस हवालदार रवींद्र काळे,युवराज हिवाळे,अशोक नागरगोजे,चांगदेव बागुल रामेश्वर ताठे यांच्या पथकाने केली आहे.प्रकरणाचा अधिक तपास निरीक्षक प्रतिभा अबूज या करीत आहे.

# बेलापुरात राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद; ३,३१८ बालकांना डोस

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण' मोहिमेला पालकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. बेलापूर प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या ६ केंद्रांमधील १२ गावांतील एकूण ३,३१८ बालकांना पोलिओचे डोस देऊन ही मोहीम यशस्वीरीत्या राबविण्यात आली.

लसीकरण मोहिमेचा प्रारंभ तालुका संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष शरद नवले आणि बाजार समितीचे माजी उपसभापती अभिषेक खंडागळे यांच्या हस्ते बालकांना पोलिओचे डोस देऊन करण्यात आला.

या प्रसंगी,डॉ. अश्विनी लिप्टे, बाळासाहेब दाणी,पुरुषोत्तम भराटे,तस्वर बागवान, प्रतापराव हुडे,ग्रेटा कदम, आरोग्य केंद्राचे कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशा सेविका व नागरिक उपस्थित होते.

या मोहिमेच्या यशासाठी ग्रामपंचायत आणि प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरून मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात आली होती.आरोग्य कर्मचारी आणि आशा सेविकांनी प्रत्यक्ष घरोघरी जाऊन पालकांशी संपर्क साधला होता. या चोख नियोजनामुळेच पहिल्याच दिवशी नागरिकांनी केंद्रांवर गर्दी करत आपल्या बालकांना पोलिओ सुरक्षा कवच मिळवून दिले. आरोग्य प्रशासनाने ही मोहीम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे आभार मानले आहेत.

# 'जन्मोजन्मी हाच पती मिळू दे' असे म्हणत सुवासिनींचा वटपौर्णिमेचा सण उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** सुवासिनींचा अति महत्वाचा समजला जाणारा वट पौर्णिमा हा सण, २९ जून २०२६ रोजी मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. याप्रसंगी महिलांनी पतीच्या दीर्घायुष्यासाठी वटवृक्षाचं मनोभावे पूजन केलं.

या दिवशी व्रत करण्याला महत्व आहे. विवाहित स्त्रिया आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी वट पौर्णिमेच्या दिवशी वडाच्या झाडाची पूजा करतात आणि निर्जल व्रत ठेवतात. असं म्हणतात की, या दिवशी सुवासिनी स्त्रियांनी आपल्या पतीसाठी व्रत ठेवलं तर तोच पती त्यांना सात जन्मांसाठी मिळतो. तसेच सावित्री देवी या दिवशी विवाहित जोडप्यांवरती कृपा करत असते असं माणलं जातं. अशी माहिती उपस्थित महिलांनी दिली.

या प्रसंगी राहूरी शहरातील विविध ठिकाणी वटवृक्षाचं पूजन करण्यासाठी महिला नटून थटून मोठ्या प्रमाणात गर्दी केल्याचं दिसून आले . महिलांनी सकाळ पासूनच उपवास ठेऊन वटवृक्षाचं पूजन केलं. आपापसांमध्ये हळदी कुंकवाचं आदानप्रदान करून, फुगडी खेळून मोठ्या उत्साहात आणि आनंदात हा सण साजरा करण्यात आला.



# सात्रळ तांभेरे रस्त्याचे काम तातडीने करा अन्यथा तीव्र आंदोलन : किरण कडू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यातील सात्रळ तांभेरे रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था झाली आहे. परिणामी शालेय विद्यार्थी, शेतकरी व सर्व सामान्य नागरिकांचे प्रचंड हाल होत आहे. सदर रस्त्याचे काम तातडीने करावे. अन्यथा तीव्र स्वरुपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा किरण कडू यांनी दिला.

रस्त्याच्या प्रश्ना बाबत राहुरी तालुक्यातील सात्रळ तांभेरे परिसरातील अनेक नागरीकांनी दि. २९ जून २०२६ रोजी सकाळपासून राहुरी तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरु केले. यावेळी किरण कडू यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रसंगी अमृत धुमाळ म्हणाले कि, राहुरी तालुक्याला सुदैवाने तीन आमदार व दोन खासदार मिळाले आहेत. तरी देखील तालुक्यातील ग्रामीण भागांना जोडणाऱ्या रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. शहरातील रस्त्यांची देखील मोठ्या प्रमाणावर दुरावस्था झाली आहे. त्यामुळे सर्व सामान्य नागरिकांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागत आहे. शहर व तालुक्यातील सर्वच रस्ते लवकरात लवकर दुरुस्त करावे, अशी मागणी धुमाळ यांनी केली.




ग्रामस्थांच्या वतीने दिलेल्या प्रसीद्धी पत्रकात म्हटले, सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत येणाऱ्या सात्रळ ते तांभेरे रस्त्याची अनेक दशकांपासून दयनीय अवस्था झाली आहे. रस्त्यावर मोठ मोठी खड्डे पडली आहेत. त्यामुळे रस्त्याने पायी चालणे देखील मुश्किल झाले आहे. अनेक वेळा नगर मनमाड हायवेवर होणाऱ्या ट्राफीक जामला पर्याय म्हणून या रस्त्याचा वापर सातत्याने सुरु आहे. त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले. सात्रळ, सोनगाव, धानोरे हे राहुरी तालुक्याच्या दृष्टीने महत्वाची बाजार पेठ आहे. सात्रळ तांभेरे हा रस्ता तालूक्याला जाणारा एकमेव महत्वाचा रस्ता आहे. या प्रश्ना बाबत शासन दरबारी वेळोवेळी पाठपुरावा करुनही यश आले नाही. सदर रस्ता सात मीटर रुंदीचा करण्यात यावा. सदर रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत किंवा प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेत घेण्यात यावा. सद्य स्थितीमध्ये रस्त्याच्या कडेच्या काट्या काढून मुरुम टाकण्यात यावा. अशी मागणी करण्यात आली.

सदर रस्त्याचे काम तातडीने न झाल्यास तीव्र स्वरुपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा किरण कडू यांनी दिला. या धरणे आंदोलन प्रसंगी सात्रळ, सोनगाव, धानोरे परिसरातील अनेक नागरीक उपस्थित होते.

# तंत्रज्ञानाबद्दल माहिती देणाऱ्या कृषी वाहिनीला शेतकऱ्यांकडून अधिक पसंती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत सुरू असलेल्या फुले कृषी वाहिनी ९०.८ एफएमला ग्रामीण भागातील शेतकऱ्यांकडून वाढता प्रतिसाद मिळत असून, आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती प्रभावीपणे पोहोचविणारे हे महत्त्वाचे माध्यम ठरत असल्याचे प्रतिपादन विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अशोकराव ढगे यांनी केले.

कृषी विस्तार शास्त्रज्ञ डॉ. आनंद चवई यांच्याशी संवाद साधताना डॉ. ढगे म्हणाले की, शेतकऱ्यांच्या सेवेसाठी सुरू करण्यात आलेल्या या वाहिनीद्वारे विविध पिकांचे आधुनिक तंत्रज्ञान, नवीन वाण, सुधारित शेती पद्धती तसेच कृषी संशोधनाची माहिती सातत्याने प्रसारित केली जाते. राहुरी कृषी विद्यापीठ व त्याच्या संशोधन केंद्रांमध्ये दहा जिल्ह्यांतील विविध पिकांवर संशोधन सुरू असून, त्याचा थेट लाभ शेतकऱ्यांना होत आहे.

फुले कृषी वाहिनीवर प्रगतशील शेतकरी, कृषी शास्त्रज्ञ, पशुविज्ञान व कृषी अभियांत्रिकी क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मुलाखती आणि मार्गदर्शनपर कार्यक्रम प्रसारित केले जातात. तसेच देशभरात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कृषी पदवीधरांच्या यशोगाथाही शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहेत. युवा शेतकऱ्यांनी फुले कृषी वाहिनी ९०.८ वर प्रसारित होणाऱ्या आधुनिक



कृषी तंत्रज्ञानाचा अधिकाधिक लाभ घेऊन शेती अधिक उत्पादनक्षम व फायदेशीर करण्याचे आवाहन डॉ. अशोक ढगे यांनी केले.

## निधन वार्ता

### रामलिंग ननवरे



**कर्जत :** शहरातील यशवंत शिक्षण संस्थेचे अमरनाथ विद्यालयाचे सेवानिवृत्त शिक्षक रामलिंग दगडू ननवरे यांचे सोमवारी (दि.२९) रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. ते ६८ वर्षांचे होते. गणित विषयाचे आदर्श शिक्षक म्हणून ते कर्जत परिसरात विद्यार्थ्यांसह शैक्षणिक क्षेत्रात परिचित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, दोन मुले, सुना-जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### संपतराव तांबे



**प्रवरानगर :** राहाता तालुक्यातील दाढ बुद्रुक येथील जुन्या पिढीतील संपतराव देवराम पा.तांबे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.ते ९० वर्षांचे होते.त्यांच्या मागे पत्नी,एक मुलगा,दोन मुली,सुना,नातवंडे असा मोठा परिवार आहे.जनसेवा मंडळ औरंगपूरचे अध्यक्ष विजयराव डेंगळे यांचे ते सासरे होत.

# आरआर काबेल फाउंडेशनच्या 'रोशनी' उपक्रमांतर्गत रस्ता सुरक्षा मोहीम यशस्वी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाशिक :** आरआर काबेल फाउंडेशनच्या सीएसआर उपक्रम 'रोशनी' अंतर्गत एलिक्सिर फाउंडेशनच्या सहकार्याने राबविण्यात आलेली 'वाहतूक जागरूकता, व्यवस्थापन आणि रस्ता सुरक्षा मोहीम' यशस्वीरित्या पूर्ण झाली. नाशिक जिल्ह्यासह विविध ठिकाणी रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती करणे आणि वाहतूक पोलिसांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

या मोहिमेअंतर्गत वर्दळीचे चौक, अपघातप्रवण क्षेत्रे, शाळा आणि रुग्णालयांजवळ जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आले. चालकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे, अतिवेग टाळावा, मद्यपान करून वाहन चालवू नये तसेच आपत्कालीन परिस्थितीत पोलिसांना त्वरित मदत मिळावी, यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या.




या मोहिमेद्वारे १० हजारांहून अधिक विद्यार्थी व नागरिकांपर्यंत रस्ता सुरक्षा, पादचारी सुरक्षा आणि प्रथमोपचार याबाबत महत्त्वपूर्ण माहिती पोहोचविण्यात आली. तसेच पोलिस बूथवर जनजागृतीपर बॅनर्स लावून व्यापक स्तरावर संदेश देण्यात आला. रस्ता सुरक्षेच्या विषयावर आयोजित चित्रकला स्पर्धेत सुमारे १ हजार स्पर्धकांनी सहभाग नोंदवत समाजात सुरक्षित वाहतुकीचा संदेश दिला.

वाहतूक पोलिसांना अधिक सक्षम करण्यासाठी एकूण ७५ नवीन वाहतूक पोलिस बूथ उभारण्यात आले. त्यापैकी ५५ बूथ पुण्यात तर २० बूथ नाशिकमध्ये बसविण्यात आले असून त्यामुळे वाहतूक पोलिसांची कार्यक्षमता, सुरक्षितता आणि नागरिकांशी संपर्क अधिक प्रभावी होण्यास मदत झाली आहे.

यावेळी आरआर ग्लोबलच्या संचालिका कीर्ती काब्रा यांनी सांगितले की, रस्ता सुरक्षा ही केवळ सामाजिक जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. एलिक्सिर फाउंडेशनच्या सहकार्याने राबविलेल्या या मोहिमेमुळे नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण झाली असून अधिक सुरक्षित आणि जबाबदार समाज घडविण्याच्या दिशेने हा महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

या प्रकल्पाची सांगता अधिकृत हस्तांतरण सोहळ्याने झाली असून, कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्वाच्या माध्यमातून समाजहितासाठी राबविण्यात आलेला हा उपक्रम आदर्शवत ठरल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

मंगळवार दि .३० जून २०२६

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२४ ४६७ ७०५ | ७-१ | १२५ १६२ १०९ | जोड १६-२१-३४-०८--५८ |

### कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १२६ ४५० १४४ | ९-२ | १५६ २४६ ६३५ | जोड ९०-१२-३४-८६-२९ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२९ ४८० २२८ | २-० | १९० २८० २४४ | जोड २१-७०-३८-६४-०९ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/04/2026 to 13/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 20/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 20/04/2026 to 27/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 04/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 11/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 18/05/2026 | 566 79 270 | 370 09 234 | 600 68 233 | 190 01 128 | 477 85 159 |
| 18/05/2026 to 25/05/2026 | 890 79 450 | 568 96 178 | 147 22 129 | 788 30 488 | 289 93 256 |
| 25/05/2026 to 01/06/2026 | 560 11 290 | 346 37 133 | 890 78 468 | 190 05 258 | 460 06 556 |
| 01/06/2026 to 08/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 15/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 5 | |

# 'वटसावित्री' सणानिमित्त हरित संस्कारांचा जागर!

## महिला भगिनींना मोफत वडाच्या रोपांचे वितरण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** भारतीय संस्कृतीतील वृक्षपूजनाची परंपरा आणि पर्यावरण संवर्धनाची आधुनिक गरज यांचा सुंदर संगम घडवत साई द्वारका सेवा ट्रस्ट व अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने, अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपमहापौर एडवोकेट धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या 'पालकमंत्री ग्रीन सिटी' अभियानांतर्गत वटसावित्री पौर्णिमेच्या सणानिमित्त महिला माता-भगिनींना मोफत वडाच्या रोपांचे वितरण करण्यात आले. पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणाऱ्या या अभिनव उपक्रमाला महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत शहराला हरित बनविण्याचा संकल्प व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते वडाच्या रोपांचे वितरण करण्यात आले. यावेळी मा नगरसेविका सुप्रिया धनंजय जाधव, अर्चना परकाळे, पुनम मुथा, दीपाली काकडे, जया शेलार, अर्चना काकडे, सुनीता कवळे, सीमा काकडे, दीपाली तुंगार, आशा पांडुळे, रितू लेले यांच्यासह मोठ्या संख्येने महिला



माता-भगिनी उपस्थित होत्या.

यावेळी बोलताना उपमहापौर एडवोकेटधनंजय जाधव यांनी ग्रीन सिटी' ही केवळ एक योजना नसून प्रत्येक नागरिकाचा सहभाग असलेली सामाजिक लोकचळवळ असल्याचे सांगितले. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक कुटुंबाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले. आज लावलेले प्रत्येक रोप उद्याच्या पिढ्यांना शुद्ध हवा, स्वच्छ पर्यावरण आणि समृद्ध जीवन देईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

मा,नगरसेविका सुप्रिया धनंजय जाधव यांनी वटसावित्री पौर्णिमेचे धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय महत्त्व अधोरेखित केले. भारतीय संस्कृतीत वडाच्या वृक्षाला दीर्घायुष्य, समृद्धी आणि जीवनदायी शक्तीचे प्रतीक मानले जाते. त्यामुळे परंपरेचे जतन करताना पर्यावरण संवर्धनाची जबाबदारीही प्रत्येकाने स्वीकारली पाहिजे, असे त्या म्हणाल्या.

पुनम मुथा म्हणाल्या की नामदार पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेमध्ये महिलांच्या सक्रिय सहभागातून हरित क्रांतीची नवी चळवळ उभारली जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी कैलास दिघे, हर्षल आगळे, अशोक कुटे, ड. दिनानाथ जाधव, राहुल मुथा,सोनू बोरुडे यांच्यासह अनेक निसर्गप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

द•ख•ल

### फोटो व्हायरल करण्याची ॲसिड फेकण्याची धमकी

**अहिल्यानगर :** एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वडगावगुप्ता परिसरात एका तरुणीचा विनयभंग करून तिचे फोटो व्हायरल करण्याची तसेच सिड फेकून ठार मारण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी सार्थक कराळे व त्याच्या तीन अनोळखी साथीदारांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, साईराज नगर येथील भाऊच्या ढाब्याजवळ ही घटना घडली. संशयित सार्थक कराळे याने पीडित तरुणीला तू मला आवडतेस असे म्हणत तिच्याशी अश्लील वर्तन केले. तसेच, तिचे फोटो आपल्याकडे असून ते सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिली. या प्रकाराची माहिती तरुणीच्या नातेवाईकांना मिळाल्यानंतर आरोपी व त्याच्या तीन साथीदारांनी तरुणीच्या भावाला अडवून शिवीगाळ केली. तुझ्या अंगावर सिड फेकून मारून टाकीन, अशी धमकी देत ते तेथून पसार झाले. पीडितेच्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### सक्षम संस्थेच्या स्थापना दिनानिमित्त दिव्यांगांसाठी विशेष मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**अहिल्यानगर :** सक्षम संस्थेच्या स्थापना दिनानिमित्त दिव्यांग बांधवांसाठी विशेष मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन बुधवार, दि. १ जुलै रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत नवीन टिळक रोड येथील विघ्नहर्ता हॉस्पिटलमध्ये करण्यात आले असल्याची माहिती सक्षम संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. या शिबिरामध्ये दिव्यांगांची विविध तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी करून आवश्यक औषधोपचार करण्यात येणार आहेत. यामध्ये मेडिसिन तज्ज्ञ डॉ. पीयूष मराठे, अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. महेश वीर, डॉ. अखिल धानोरकर व डॉ. अमित कुलंगे, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सुप्रिया वीर व डॉ. निलोफर धानोरकर, नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. राजीव चिटगोपेकर, कान-नाक-घसा तज्ज्ञ डॉ. आनंद तुळजापुरे तसेच दंतचिकित्सक डॉ. कुलकर्णी व डॉ. कीर्ती कोल्हे हे तपासणी करून मार्गदर्शन करणार आहेत. शिबिरामध्ये स्त्रीरोग, दंतचिकित्सा, सर्वसाधारण वैद्यकीय तपासणी, अस्थिरोग, कान-नाक-घसा, नेत्र तपासणी, नेत्रदान नोंदणी आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच जनकल्याण रक्तपेढीच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले असून विविध क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टर आरोग्यविषयक मार्गदर्शन करणार आहेत.

### वटपौर्णिमेच्या पवित्र पर्वावर रेणुकामातेच्या चरणी महिलांची मांदियाळी



**शेवगाव :** विवाहित महिलांच्या अखंड सौभाग्याचे, पतीच्या दीर्घायुष्याचे आणि कौटुंबिक सुख-समृद्धीचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या वटपौर्णिमेच्या पवित्र पर्वानिमित्त श्रीक्षेत्र अमरापूर येथील श्री रेणुका माता देवस्थानात सोमवारी (दि. २९) पंचक्रोशीतील महिलांची मोठी मांदियाळी आढळली. पारंपरिक वेशभूषेत आलेल्या महिलांनी वटवृक्षाची विधिवत पूजा करून श्री रेणुका मातेचे दर्शन घेत भक्तिभाव व्यक्त केला. शेवगावासह तालुक्यात ठिकठिकाणी वटपौर्णिमा साजरी करण्यात आली. भारतीय संस्कृतीत वटपौर्णिमेला विशेष धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. सावित्रीने आपल्या पती सत्यवानाचे प्राण यमराजाकडून परत मिळविल्याच्या पौराणिक कथेला स्मरून हे व्रत पाळले जाते. वडाचे झाड दीर्घायुष्य, स्थैर्य आणि अखंड सौभाग्याचे प्रतीक मानले जात असल्याने विवाहित महिला उपवास करून वटवृक्षाभोवती सुती धागा गुंडाळत फेऱ्या मारतात व कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करतात. यावेळी विवाहीत महिलांनी फुले, अक्षता, हळदी-कुंकू अर्पण करून श्रद्धापूर्वक पूजा केली.



अखंड सौभाग्य, पतीच्या दीर्घायुष्याची कामना आणि जन्मोजन्मी हाच पती लाभावा, या श्रद्धेने महिलांनी वडाच्या वृक्षाची विधिवत पूजा करून डोरा बांधला व पारंपरिक पद्धतीने फेरे घेतले. (छाया-वाजिद शेख- नगर)

### प्रा. रागिनी कदम-टेकाळे यांना हिंदी विषयातील पीएच.डी. पदवी प्रदान

**अहिल्यानगर :** देवळाली प्रवरा येथील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या राजर्षी शाहू महाविद्यालयात हिंदी



विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या रागिनी कदम-टेकाळे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्याकडून हिंदी विषयातील इक्कीसवीं सदी के हिंदी उपन्यास: संवेदना के विविध आयाम या विषयावर पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी रामचंद्र दरे, मनोज कदम, महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच देवळाली प्रवरा शहर परिसरातील नागरिकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### योग विद्याधामतर्फे १ जुलैपासून विविध योग वर्गांना प्रारंभ

**अहिल्यानगर :** शहरातील योग विद्याधामतर्फे येत्या १ जुलैपासून नागरिकांसाठी विविध योग प्रशिक्षण वर्गांना सुरुवात करण्यात येणार आहे. यामध्ये प्राथमिक योगासन वर्ग, योग परिचय वर्ग आणि प्राणायाम वर्ग यांचा समावेश असून सर्व वयोगटातील नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन योग विद्याधामचे अध्यक्ष डॉ. सुंदर गोरे यांनी केले आहे. हे सर्व वर्ग योग भवन, ज्ञानेश्वर ड्रायव्हिंग स्कूल मागे, कुष्ठधाम रोड, सावेडी, अहिल्यानगर येथे नियमितपणे आयोजित करण्यात येणार आहेत. प्रशिक्षित मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली योगाभ्यासाचे प्रशिक्षण दिले जाणार असून शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी हे वर्ग उपयुक्त ठरणार आहेत. योगाभ्यासामुळे निरोगी जीवनशैली अंगीकारण्यास मदत होत असल्याने नागरिकांनी या वर्गांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन वर्गप्रमुख अनिरुद्ध भागवत यांनी केले आहे.

## कुंडीतील वडाच्या झाडाची १२ वर्षांपासून अखंड पूजा



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** वटपौर्णिमा हा सुवासिनींच्या श्रद्धा, परंपरा आणि अखंड सौभाग्याचे प्रतीक मानला जाणारा सण आज शहरासह जिल्हाभर मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वडाच्या झाडाची विधीवत पूजा करून सात प्रदक्षिणा घालत पतीच्या दीर्घायुष्याची व अखंड सौभाग्याची प्रार्थना महिलांनी केली.

शहरातील विविध भागांमध्ये वडाच्या झाडांजवळ महिलांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. मात्र, चितळे रोड परिसरातील कुंभार गल्ली येथील महिलांनी गेल्या बारा वर्षांपासून जपलेली एक वेगळी परंपरा यंदाही सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. कुंभार गल्लीतील महिलांनी तब्बल १२ वर्षांपूर्वी एक अभिनव निर्णय घेत आपल्या गल्लीतच एका कुंडीत वडाचे रोप लावले. परिसरात मोठे वडाचे झाड उपलब्ध नसल्याने आणि लांब अंतरावर जाऊन पूजा करण्याची अडचण लक्षात घेऊन, आपल्याच परिसरात वडाचे झाड वाढवू आणि त्याचीच पूजा करू, असा संकल्प त्यांनी केला.

## प्रभाग क्रमांक ७ मध्ये स्वच्छता मोहीम नागरिकांकडून समाधान व्यक्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अमरापूर :** शेवगाव, दि. - शहर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी ठेवण्याच्या उद्देशाने शेवगाव नगरपरिषदेच्या वतीने प्रभाग क्रमांक ७ मध्ये विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. नगरसेवक वजीर पठाण यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या मोहिमेत इदगाह मैदान, सिद्धिविनायक कॉलनी, नवीन बाजार तळ, श्यामनगर, रामनगर तसेच परिसरातील विविध भागांची व्यापक स्वच्छता करण्यात आली.

या मोहिमेदरम्यान मुख्य व अंतर्गत रस्ते, गटारे, नाले आणि सार्वजनिक ठिकाणी साचलेला कचरा हटविण्यात आला. जेसीबीच्या साहाय्याने गटारी व नाल्यांमधील गाळ काढून परिसर स्वच्छ करण्यात आला. स्वच्छता कर्मचाऱ्यांनी सकाळपासूनच परिश्रमपूर्वक काम करून संपूर्ण परिसर स्वच्छ व नीटनेटका केला.

यावेळी नगरसेवक वजीर पठाण यांनी स्वच्छता कर्मचाऱ्यांचे कौतुक करत पावसाळ्यापूर्वी नाले व गटारींची नियमित साफसफाई केल्यास पाणी साचण्याच्या समस्या कमी होऊन साथीच्या रोगांचा धोका कमी होण्यास मदत होईल, असे सांगितले.

नागरिकांनीही या उपक्रमाचे स्वागत करत घरगुती तसेच सार्वजनिक ठिकाणचा कचरा योग्य ठिकाणी टाकून परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन केले. स्वच्छ परिसर, निरोगी जीवन हा संदेश प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचावा आणि अशा स्वच्छता मोहिमा सातत्याने राबवाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

या विशेष स्वच्छता मोहिमेमुळे प्रभाग क्रमांक ७ मधील परिसर अधिक स्वच्छ, सुंदर व आकर्षक झाल्याने नागरिकांनी नगरपरिषदेच्या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले.

## दिल्लीगेटचे 'दुभाजक' ठरतात वाहतुकीला अडथळे



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** दिल्ली गेट रस्त्यावरील नव्याने उभारलेल्या दुभाजकामुळे गेल्या पंधरा दिवसांपासून वारंवार अपघात होत असून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी दुभाजक स्पष्टपणे दिसत नसल्याने चारचाकी व दुचाकी वाहने त्यावर आदळत आहेत. एखादी दुर्दैवी घटना घडण्यापूर्वी महापालिका प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मनपा उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी दिला आहे.

**अपघांताची मालिका सुरूच**
**उपमहापौरांचा आंदोलनाचा इशारा**

दुभाजकावर रेडियम रिफ्लेक्टर, दिशादर्शक फलक तसेच वाहतूक नियम दर्शविणारे पट्टे नसल्यामुळे वाहनचालकांना दुभाजकाचा अंदाज येत नाही. त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढत असल्याचे जाधव यांनी सांगितले. यासंदर्भात उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. यावेळी शहर अभियंता श्रीकांत निंबाळकर, सुनील सुडके, धीरज रोहोकले, राजेंद्र येडे, बाळासाहेब सांगोळे उपस्थित होते.

## तेलुगू सांस्कृतिक महोत्सवाला अहिल्यानगरात उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य तेलुगू साहित्य अकादमीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'भारतरत्न लता मंगेशकर - संगीताची सरस्वती' या विशेष व्याख्यानासह भव्य तेलुगू सांस्कृतिक कार्यक्रमाला अहिल्यानगरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. साहित्य, संगीत आणि संस्कृतीचा अनोखा मिलाफ अनुभवायला मिळालेल्या या कार्यक्रमात भारतरत्न स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या अजरामर संगीत वारशाचा जागर करण्यात आला. व्याख्यानातून त्यांच्या जीवनातील अनेक अपरिचित



पैलू उलगडले गेले, तर विविध पारंपरिक नृत्य सादरीकरणांनी उपस्थितांना भारतीय पारंपारिक शास्त्रीय संस्कृतीचे वैभव अनुभवण्याची संधी दिली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी तेलुगू साहित्य अकादमीचे समन्वयक अशोक कंटे, स्थानिक समन्वयिका सुरेखा कोडम व श्री भिमराज कोडम, महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधी हरीश इरनक तसेच 'भारतरत्न लता मंगेशकर - संगीताची सरस्वती' या पुस्तकाचे लेखक आणि प्रमुख व्याख्याते कस्तुरी मुरलीकृष्णा यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. दीपप्रज्वलनानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले आणि कार्यक्रमाची सुरुवात सांस्कृतिक वातावरणात झाली.

प्रमुख व्याख्याते कस्तुरी मुरलीकृष्णा यांनी आपल्या प्रभावी भाषणात लता मंगेशकर यांच्या जीवनप्रवासाचा अत्यंत हृदयस्पर्शी आढावा घेतला. ते म्हणाले, लतादीदी या साक्षात सरस्वतीचा अवतार होत्या. त्यांनी भारतातील जवळपास प्रत्येक राज्यातील भाषांमध्ये आपल्या सुमधुर आवाजातून गीते सादर करून भारतीय संगीताला जागतिक स्तरावर एक वेगळी ओळख मिळवून दिली. त्यांच्या स्वरांनी लाखो-कोट्यवधी भारतीयांच्या भावना व्यक्त केल्या. त्यांच्या कर्तृत्वाची उंची इतकी महान आहे की, लतादीदींसारखे व्यक्तिमत्त्व पुन्हा होणे अशक्य आहे.

## फळविक्रेत्याला लाकडी दांडक्याने मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** छत्रपती संभाजीनगर रस्त्यावरील एम्स रुग्णालयासमोर एका १६ वर्षांच्या अल्पवयीन फळविक्रेत्याला अडवून तिघांनी लाकडी दांडक्याने आणि लाथाबुक्क्यांनी गंभीर मारहाण केली. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. अतिक सलीम बागवान (वय १६, रा. परशा खुंट, पिंजार गल्ली, अहिल्यानगर) असे जखमीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अतिक बागवान हा रविवारी दुपारी एम्स रुग्णालयासमोरून जात असताना मोपेड वाहनावरून तीन आरोपी आले. यामध्ये मोहोज फय्याज शेख, करीम शेख आणि जहीद जावेद शेख (सर्व राहणार पिंजारगल्ली, अहिल्यानगर) अशी आरोपींची नावे आहेत. आरोपी मोहोज याने त्याच्या हातातील लाकडी दांडक्याने मारहाण केली. तसेच इतर दोन साथीदार करीम शेख व जहीद शेख यांनी अतिकला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या मारहाणीत अतिक गंभीर जखमी झाला. आरोपींनी त्याचे हातपाय तोडून जिवे ठार मारण्याची धमकी दिली. तसेच शिवीगाळ करून मोबाईल फोन फोडला. जखमीला उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत तोफखान्याचे पो.नि. बी. एम. वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार ए. पी. इनामदार हे पुढील तपास करत आहेत.

## पैसे चोरीची विचारपूस केल्याने कुटुंबाला मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** केडगावच्या लिंक रोडवरील कारमेल शाळेजवळ खळबळजनक घटना घडली. घरातील पैसे चोरीला गेल्याच्या संशयावरून विचारपूस केल्याने प्रचंड राग मनात धरून आरोपींनी फिर्यादी आणि त्यांच्या मुलाला लाकडी दांडक्याने व केबल वायरने बेदम मारहाण केली. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांच्या घरातील सोळा हजार रुपयांची रोख रक्कम चोरीला गेली होती. या चोरीबाबत फिर्यादी यांनी संशयित आरोपी सरस्वती नितीन चव्हाण व इतर चार अनोळखी व्यक्तींकडे विचारपूस केली. याचा राग अनावर झाल्याने आरोपींनी फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. आरोपी सरस्वती चव्हाण हिने हातातील लाकडी दांडके फिर्यादीच्या डोक्यात मारून त्यांना गंभीर जखमी केले. यावेळी फिर्यादीचा मुलगा मध्यस्थी करत असतांना इतर तीन अनोळखी इसमांनी त्यालाही लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच फिर्यादीच्या घराचा दरवाजा तोडून मोठ्या प्रमाणावर नुकसान केले. जखमींना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी पाच जणांविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## लहुजी वस्ताद साळवेंच्या पुतळ्यासाठी मातंग समाज एकवटला

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील आद्य क्रांतिगुरू लहुजी साळवे (जुना अप्पू हत्ती) चौक येथे सध्या उभारण्यात आलेल्या अश्वाच्या ठिकाणी लहुजी वस्ताद साळवे यांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात यावा, या मागणीसाठी केडगावातील सकल मातंग समाज एकवटला आहे. या मागणीसाठी केडगावच्या छत्रपती शिवाजी मंगल कार्यालयात सकल मातंग समाजाची बैठक पार पडली. या बैठकीत समाजबांधवांनी एकमुखाने अश्वारूढ पुतळ्याची मागणी करून तसा ठराव मनपाच्या महासभेत मंजूर करावा. अशी मागणी करताच नगरसेवकांनी त्याला होकार



दिला. सुरूवातीला प्रा. विशाल पाचारणे यांनी समाजबांधवांचे स्वागत केले. यावेळी मा.प्रा. ना.म.साठे, रविंद्र शेलार, निवृत्ती साळवे, मनोज साठे, सयाजी अवचिते, विकास उडानशिवे, भगवान जगताप, संदीप सकट व श्याम वैराळ यांनी मनोगत व्यक्त केले. नगरसेवक दत्ता गाडळकर व वर्षा काकडे, धनंजय पाचारणे, सनी पाचारणे, राजू बोरगे, महेश लोखंडे, विष्णू लोखंडे, संतोष उमाप, अक्षय बोरगे, गोरख लोखंडे उपस्थित होते.

# खड्ड्यांवर डांबराऐवजी मातीचा मुलामा!

## बाबुर्डी बेंद-वाळकी रस्त्यावरील धक्कादायक प्रकार ; ग्रामस्थांचा रस्तारोकोचा इशारा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**नगर तालुका :** नगर तालुक्यातील बाबुर्डी बेंद ते वाळकी हा महत्त्वाचा रस्ता पहिल्याच पावसात अक्षरशः उखडून निघाला असून प्रशासनाने खड्डे बुजवण्यासाठी डांबराऐवजी मातीमिश्रित मुरूम टाकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

बाबुर्डी बेंद, हिवरे झरे, घोसपुरी, सारोळा कासार, खडकी, जाधववाडी आदी गावांतील शेकडो विद्यार्थी दररोज शिक्षणासाठी वाळकी येथे ये-जा करतात. मात्र, रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याने विद्यार्थ्यांसह नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या रस्त्यावरून दररोज शेकडो नागरिक तसेच सुपा, वाळवणे, असतगाव, सारोळा कासार आणि दौंड रोडकडून येणारे प्रवासीही सोलापूर महामार्गाकडे प्रवास करतात.

वाळकी ते बाबुर्डी बेंद शिवरस्त्यापर्यंतचे काम अद्याप



अपूर्ण असून संबंधित ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे काम केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे करण्यात आलेल्या कामाची तातडीने चौकशी करून संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

सामाजिक कार्यकर्ते लहू कासार यांच्यासह परिसरातील नागरिकांनी रस्त्यावरील खड्डे माती टाकून बुजवले जात असल्याचा प्रकार उघडकीस आणला आहे. ही केवळ मलमपट्टी असून नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली.

दरम्यान, लहू कासार, आबासाहेब चोभे, महादेव चोभे, संदीप चोभे, सार्थक चोभे, सोपान चोभे, कैलास चोभे, विकास कासार, आकाश कासार, गुलाब चोभे, तेजस चोभे, भाऊसाहेब नागवे, राम साळवे आणि अनिल चोभे यांनी प्रशासनाला आठ दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे. आठ दिवसांत रस्त्याचे काम सुरू झाले नाही आणि खड्ड्यांची योग्य दुरुस्ती झाली नाही, तर नगर-दौंड महामार्गावर तीव्र रस्तारोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

खड्ड्यांवर माती टाकून प्रशासन नेमकं कोणाची दिशाभूल करत आहे? नागरिकांच्या जीवाशी सुरू असलेला हा खेळ थांबणार कधी?, असा सवाल आता संतप्त ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

द•ख•ल

## खडकी येथील जिल्हा परिषद शाळेला आरओ वॉटर फिल्टरची भेट

**लोणी धामणी :** खडकी ( ता . आंबेगाव ) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, महादेव पांढरी वस्ती येथील विद्यार्थ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने शाळेला आरओ वॉटर फिल्टर भेट देण्यात आला. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. नितीन राक्षे यांनी शाळेसाठी आरओ फिल्टरची आवश्यकता असल्याचे सांगितल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) आंबेगाव तालुकाध्यक्ष विशाल वाबळे व सचिन हगवणे यांच्या पुढाकारातून



हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना सुरक्षित व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होणार असून पालक व ग्रामस्थांनी या सामाजिक उपक्रमाचे स्वागत केले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. नितीन राक्षे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) आंबेगाव तालुकाध्यक्ष विशाल वाबळे, सचिन हगवणे, राजू बांगर, अनिल पोखरकर, शांताराम माळवदे, पल्लवी वाबळे, प्रांजल हगवणे, किरण पोखरकर, विकास निघोट तसेच शाळेचे शिक्षक उपस्थित होते. मुख्याध्यापक श्री. चिखले सर यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानून विद्यार्थ्यांच्या हितासाठी अशा सामाजिक उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले.

## पालखी मार्गावरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्याबाबतचे आदेश जारी

**पुणे :** श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे ८ जुलै २०२६ रोजी श्री क्षेत्र आळंदी येथून प्रस्थान होणार आहे, यादृष्टीने ग्रामीण हद्दीत पालखी प्रस्थान सोहळा बंदोबस्त ११ ते १५ जुलै या कालावधीत असून पालखी मार्गावरील वाहतूकीमध्ये बदल करुन ती पर्यायी मार्गाने वळविण्याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डुडी यांनी यांनी जारी केले आहेत, पुणे ते सासवड (सासवड मुक्काम):* ११ जुलै रोजी पहाटे २ वाजल्यापासून ते १३ जुलै रोजी रात्री १२ वाजेपर्यंत पुणेकडून सासवडकडे दिवेघाट व बोपदेव घाटमार्गे जाणारी वाहतूक पूर्णपणे बंद राहणार आहे, या मार्गावरील वाहने खडी मशीन चौक-कात्रज-कापूरहोळ मार्गे जातील. सासवडकडून पुणे बाजुकडे येणारी वाहतूक गराडे-खेड-शिवापूर मार्गे वळविण्यात येणार आहे. सासवड ते जेजुरी (जेजुरी मुक्काम) आणि जेजुरी ते वाल्हे (वाल्हे मुक्काम):* १३ जुलै रोजी पहाटे २ वा. पासून ते १४ जुलै राजी १२ वा. पुणे येथून सासवड-जेजूरी-वाल्हे-निराकडे तसेच नीरायेथून पुणेकडे जाणाऱ्या वाहनांनी झेंडेवाडी-पारगाव मेमाणे-सुपे-मोरगाव-निरा या मार्गाचा वापर करावा. वाल्हे ते लोणंद (लोणंद मुक्काम):* १५ रोजी पहाटे २ वा पासून ते १५ रोजीचे सायं ५ वा. पर्यंत पुणे येथून सासवड-जेजुरी-वाल्हे-निराकडे तसेच निरा येथून पुणेकडे जाणाऱ्या वाहनांनी सासवड-जेजुरी-मोरगाव या पर्यायी मार्गाचा वापर वापर करावा. लोणंद येथून पुढे फलटण मार्गे:* १५ ते १८ जुलै या कालावधीत फलटण लोणंद येथून पुणे येथे येणारी वाहतूक शिरवळमार्गे पुणेकडे येतील. तसेच पुणे येथून फलटण व लोणंदकडे जाणारी वाहतुक शिरवळमार्ग जाईल. नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन श्री. डुडी यांनी केले आहे.

## वाहतूक नियमांचे पालन करा; अन्यथा होणार कडक कारवाई

**कवठे येमाई :** - शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांनी शिरूर पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व नागरिक व वाहनचालकांना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याचे जाहीर आवाहन केले आहे. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर नाकाबंदी व विशेष पेट्रोलिंग दरम्यान कठोर कायदेशीर कारवाई




**फशिरूरचे पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांचा कडक इशारा**

करण्यात येणार असल्याचा इशाराही पाटील यांनी दिला आहे. पोलीस निरीक्षक पाटील यांनी नुकताच शिरूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी म्हणून पदभार स्वीकारला असून धडाकेबाज कामगिरी सुरु केली आहे.शिस्तप्रिय पोलीस अधिकारी असलेले पाटील यांनी वाहनचालकांना वाहन चालविताना वैध वाहन परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स) जवळ बाळगणे, वाहनावर पुढील व मागील बाजूस नियमानुसार क्रमांक प्लेट लावणे, तसेच आरसी बुक, विमा, प्रदूषण प्रमाणपत्र (झणउ) आणि इतर आवश्यक कागदपत्रे अद्ययावत व वाहनासोबत ठेवण्याचे आवाहन केले आहे.याशिवाय, वाहन चालवताना हेल्मेट, सीटबेल्ट यांसारख्या सुरक्षाविषयक नियमांचे पालन करणे बंधनकारक असून, वाहनांच्या काचांवर बेकायदेशीर ब्लॅक फिल्म लावू नये,असेही स्पष्ट करण्यात आले आहे. शिरूर पोलीस स्टेशनकडून वेळोवेळी नाकाबंदी व पेट्रोलिंगदरम्यान वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई केली जात आहे. कायद्याचे पालन करणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये आणि रस्ते सुरक्षित राहावेत, यासाठी सर्व वाहनचालकांनी नियमांचे पालन करणे आवश्यक असल्याचे पोलीस प्रशासनाने म्हटले आहे.''वाहतूक नियमांचे पालन करून सुरक्षित आणि जबाबदार नागरिक म्हणून पोलीस प्रशासनाला सहकार्य करा,'' असे आवाहन पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांनी केले आहे.

# पुणे जिल्ह्याचा ४.६५ लाख कोटींचा वार्षिक पतपुरवठा आराखडा जाहीर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** जिल्हाधिकारी तथा जिल्हा सल्लागार समितीचे अध्यक्ष जितेंद्र डूडी यांच्या हस्ते जिल्ह्याच्या शाश्वत व सर्वसमावेशक आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या वार्षिक पतपुरवठा आराखड्याचे प्रकाशन जिल्हा सल्लागार समिती व जिल्हा स्तरीय आढावा समिती यांच्या संयुक्त बैठकीतकरण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठकीस अलोक कुमार मिश्रा, उपमहाव्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र तथा संयोजक, जिल्हा सल्लागार समिती तसेच आकर्षण अविनाश, प्रमुख जिल्हा अधिकारी, भारतीय रिझर्व्ह बँक मुंबई, पियुष खातखेडे, जिल्हा विकास व्यवस्थापक नाबार्ड, अर्चना कोठारी, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र जयानंद भारती, संचालक, ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था, सर्व बँकांचे प्रतिनिधी, राज्य शासनाच्या विविध विभागांचे जिल्हा प्रभारी व विविध आर्थिक महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. डूडी म्हणाले, जिल्ह्यातील शेती, पायाभूत सुविधा, उद्योग, स्वयंरोजगार, शेतीपूरक व्यवसाय, बचत गट आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला आर्थिक बळकटी देण्यासाठी हा पतपुरवठा आराखडा अत्यंत महत्त्वाचा आहे. आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी पुणे जिल्ह्याचा वार्षिक पतपुरवठा आराखडा ४.६५ लाख कोटी इतका निश्चित करण्यात आला आहे. यामध्ये पीक कर्ज (किसान क्रेडिट कार्ड) योजनेसाठी ७ हजार ३०० कोटी, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्रासाठी ९५ हजार ५०० कोटी आणि शेतीपूरक उद्योगांसाठी १५ हजार ४०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

मागील आर्थिक वर्षात जिल्ह्याने पतपुरवठा आराखड्याच्या ११६ टक्के उद्दिष्टपूर्ती केल्याबद्दल जिल्हाधिकारी यांनी सर्व बँका व शासकीय विभागांचे अभिनंदन केले. तसेच जिल्हा परिषद पुणे यांच्या माध्यमातून बचत गटांना ५१४ कोटींचे कर्जवाटप करण्यात आल्याबद्दल समाधान व्यक्त केले. बचत गटांमधील कर्ज थकबाकीचे प्रमाण १ टक्क्यांपेक्षा कमी राखल्याबद्दल 'उमेद' अभियानाच्या कार्यसंघाचेहीश्री. डूडी यांनी अभिनंदन केले.

हा पतपुरवठा आराखडा नाबार्ड, अग्रणी बँक, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि जिल्हा प्रशासन यांच्या समन्वयातून तयार करण्यात येतो. आराखड्यानुसार प्रत्येक बँकेस विविध क्षेत्रांमध्ये कर्जवाटपाची उद्दिष्टे निश्चित करून देण्यात येतात. बैठकीत जिल्ह्यातील बँकांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी सर्व बँकांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले. तसेच रोजगारनिर्मितीशी संबंधित योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून शासनाने दिलेली उद्दिष्टे पूर्ण करण्याचे निर्देश दिले. उद्दिष्टपूर्तीत मागे राहणाऱ्या बँकांचा शाखा व्यवस्थापक व क्षेत्रीय व्यवस्थापकांच्या उपस्थितीत दरमहा आढावा घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

पुणे जिल्ह्यात केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयांतर्गत तळेगाव दाभाडे, थेऊर आणि हडपसर येथे कार्यरत असलेल्या स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थांमध्ये मोफत प्रशिक्षण दिले जाते. जिल्ह्यातील युवकांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. तसेच या संस्थांच्या वार्षिक प्रशिक्षण कार्यक्रमाचा अहवालही प्रसिद्ध करण्यात आला.

याशिवाय पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसाय विभागामार्फत आयोजित पीक कर्ज मेळाव्यांमध्ये बँकांनी सक्रिय सहभाग घेऊन शेतकऱ्यांना वेळेत कर्ज उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश देण्यात आले. सर्व शासकीय विभागांनी आपल्या योजनांची माहिती बँक अधिकाऱ्यांना प्रशिक्षणाद्वारे देण्याची आवश्यकता असल्याचेही जिल्हाधिकारी यांनी नमूद केले. जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी जिल्हा प्रशासन, बँका आणि स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था यांच्यात अधिक प्रभावी समन्वय आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

## माऊलींच्या रथाच्या बैलजोडी मानाचा पेच अखेर सुटला

### रानवडे कुटुंबात जिल्हानिहाय तोडगा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या आषाढीवारी पालखी सोहळा सन २०२६ निमित्त श्रींच्या रथास बैलजोडी लावण्याच्या मानावर सुरू असलेल्या चर्चांना अखेर पूर्णविराम मिळाला असून, तडजोडीच्या सूत्रातून रानवडे कुटुंबाला जिल्हानिहाय बैलजोडी सेवा वाटप करण्यात आली आहे. विश्वस्त मंडळ, बैलजोडी निवड समिती आणि रानवडे कुटुंबीय यांच्यात झालेल्या सविस्तर बैठकीनंतर हा निर्णय जाहीर करण्यात आला.



यंदा बैलजोडीचा पारंपरिक मान रानवडे घराण्याकडे असल्याने संबंधित मानकऱ्यांच्या निवडीकडे वारकरी, भाविक आणि स्थानिक नागरिकांचे लक्ष लागले होते. गेल्या काही दिवसांत या विषयावर विविध स्तरांवर चर्चा सुरू होती. अखेर सर्व बाजूंचा विचार करून सामंजस्याने निर्णय घेण्यात आला. बैलजोडी समितीचे अध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे यांनी संस्थानकडे सादर करण्यात आलेल्या शिफारशीनुसार पुणे जिल्ह्यात पालखी जाताना व परत येताना श्रींच्या रथास बैलजोडी लावण्याचा मान हर्षवर्धन प्रदीप रानवडे यांना देण्यात आला आहे. सातारा जिल्ह्यातील प्रवासादरम्यान जाताना व परतीच्या मार्गावर श्रींच्या रथासाठी बैलजोडी सेवा उमेश लक्ष्मण रानवडे बजावणार आहेत. तर सोलापूर जिल्ह्यातील पालखी मार्गासाठी तुळशीराम ज्ञानोबा रानवडे यांच्याकडे ही जबाबदारी सोपविण्यात आली असल्याचे प्रमुख विश्वस्त भावार्थ देखणे व पालखी सोहळाप्रमुख ॲड.राजेंद्र उमाप यांनी सांगितले.दरम्यान, बैलजोडी सेवेचा मान मिळावा या मागणीसाठी उमेश रानवडे यांनी काही दिवसांपूर्वी आळंदीतील महाद्वार चौकात उपोषण आंदोलन केले होते. त्यावेळी संबंधित विषयावर योग्य निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यानंतरही निर्णय न झाल्याने त्यांनी न्यायालयीन लढ्याची तयारी दर्शवली होती. यानंतर विश्वस्त मंडळ, बैलजोडी समिती आणि रानवडे कुटुंबीय यांच्यात पुन्हा चर्चा झाली. परंपरा, मानपान, कुटुंबीयांची भूमिका आणि पालखी सोहळ्याचे शिस्तबद्ध आयोजन यांचा विचार करून जिल्हानिहाय जबाबदारी वाटपाचा पर्याय स्वीकारण्यात आला.यावेळी प्रमुख विश्वस्त डॉ.भावार्थ देखणे, पालखी सोहळा प्रमुख ॲड.राजेंद्र उमाप यांच्या हस्ते बैलजोडी सेवेच्या मानकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी विश्वस्त चैतन्य महाराज कबीरबुवा, पुरुषोत्तम महाराज पाटील, व्यवस्थापक माऊली वीर, बैलजोडी समिती अध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे, उपाध्यक्ष शिवाजीराव रानवडे, सदस्य नंदकुमार कुऱ्हाडे, विलास घुंडरे, रामचंद्र भोसले, ज्ञानोबा वहीले, रमेश कुऱ्हाडे तसेच रानवडे कुटुंबीय उपस्थित होते.

## आळंदीत मंगल कार्यालयांचा सुळसुळाट वाहतूक कोंडीवर लगाम कधी? विरोधीपक्षनेते आदित्य घुंडरे यांची कारवाईची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** तीर्थक्षेत्र आळंदीमध्ये दिवसेंदिवस वाढणाऱ्या मंगल कार्यालयांमुळे शहराची वाहतूक व्यवस्था कोलमडत असून नागरिकांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर नियमबाह्य व अनधिकृत मंगल कार्यालयांवर तात्काळ




प्रशासकीय कारवाई करून शहरातील वाहतूक कोंडीला आळा घालावा, अशी मागणी विरोधीपक्षनेते आदित्य घुंडरे यांनी आळंदी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे. आळंदी शहरात विवाह सोहळे, विविध सामाजिक कार्यक्रम आणि मोठ्या प्रमाणावरील गर्दीमुळे मुख्य रस्ते अनेकदा ठप्प होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अरुंद रस्ते, वाहनतळाचा अभाव आणि सार्वजनिक मार्गांवर होणारे बेशिस्त पार्किंग यामुळे सर्वसामान्य नागरिकांना रोजच त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे वाहतूक कोंडीमुळे रुग्णवाहिका, अग्निशमन दलाची वाहने तसेच विद्यार्थ्यांच्या वाहनांनाही अडथळे निर्माण होत असल्याने हा विषय केवळ वाहतुकीपुरता मर्यादित नसून सार्वजनिक सुरक्षिततेचाही बनला असल्याचे आदित्य घुंडरे यांनी म्हटले आहे. यासंदर्भात शहरातील सर्व मंगल कार्यालयांची परवानगी, अग्निसुरक्षा, वाहनतळ क्षमता आणि वाहतूक व्यवस्थापनाची तपासणी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. आवश्यक असल्यास अशा मंगल कार्यालयांचे कामकाज तात्पुरते स्थगित किंवा बंद करण्याचाही निर्णय घ्यावा, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## वटपौर्णिमेनिमित्त दिवे परिसरात वटवृक्ष पूजन उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**दिवे :** पुरंदर तालुक्यातील दिवे परिसरात वटपौर्णिमेचा सण महिला भगिनींनी पारंपरिक पद्धतीने आणि मोठ्या भक्तिभावाने साजरा केला. सकाळपासूनच पारंपरिक वेशभूषेत महिलांनी गावातील वटवृक्षाजवळ एकत्र येत विधीवत पूजा करून वटपौर्णिमेचे व्रत श्रद्धेने पार पाडले.

जन्मोजन्मी हाच पती लाभावा, कुटुंबाला सुख, समृद्धी, उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभावे, तसेच वेळेवर पाऊस पडून शेती समृद्ध व्हावी, अशी प्रार्थना महिलांनी केली. वटवृक्षाला सात फेरे मारत आंबा, खण, नारळ तसेच पूजेचे साहित्य अर्पण करून धार्मिक विधी पूर्ण करण्यात आले. महिलांनी पारंपरिक व्रताचे पालन करत श्रद्धा आणि संस्कृतीची परंपरा जपली.

याबाबत माहिती देताना पुजारी दिगंबर दिवेकर आणि पुजारी सुयश दिवेकर यांनी वटपौर्णिमेनिमित्त मंदिरात मोठ्या संख्येने भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतल्याचे सांगितले.



दिवे (ता. पुरंदर) येथे वटपौर्णिमेनिमित्त वटवृक्षाच्या पूजेसाठी एकत्र आलेल्या महिला.

## शिरूरच्या कान्हूर मेसाई त पावसाची जोरदार हजेरी

### देवीच्या मंदिर परिसरासह गावठाण परिसरात ढगफुटी सदृष्य पाऊस बरसला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** सतत दुष्काळी म्हणून गणल्या जाणाऱ्या व डोंगरपठारावर असलेल्या शिरूर तालुक्यातील कान्हूर मेसाई गावात रविवारी दुपारी जोरदार पावसाने हजेरी लावली. श्री कान्हूर मेसाई देवी मंदिर परिसरासह संपूर्ण गावठाणात ढगफुटी सदृश्य मुसळधार पाऊस झाल्याने सगळीकडे काही क्षणात पाणीच पाणी झाले. रस्त्यांना तर ओढ्याचे रूप आलेले पाहावयास मिळत होते. मंदिर आवारातून पाण्याचा प्रचंड लोंढा वाहताना दिसत होता. झालेल्या तुफानी



पावसाने परिसरातील वातावरणात गारवा निर्माण झाला.

गेल्याकाहीदिवसांपासून पावसाची चातकासारखी वाट पहात असलेल्या नागरिक आणि शेतकऱ्यांना या पावसामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. या समाधानकारक पावसामुळे शेतातील पिकांना जीवनदान मिळणार असून खरीप हंगामातील पेरण्यांनाही चालना मिळण्याची शक्यता सामाजिक कार्यकर्ते शहाजीराजे दळवी व शेतकऱ्यांतून व्यक्त केली जात आहे.घोलपवाडी, तांबे वस्ती याठिकाणी पावसाचे प्रमाण कमी असून काही ठिकाणी जोरदार, तर काही ठिकाणी हलका पाऊस परिसरात पडला असल्याचे ही दळवी यांनी सांगितले. पावसामुळे रस्त्यांवर काही काळ पाणी साचले असले तरी गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे . उर्वरित परिसरात व सर्वत्रच वरून राजाची कृपा होऊन भरपूर पाऊस व्हावा अशी अपेक्षा शेतकरी वर्ग करत आहे.

## २८ जून रोजी जिल्हाभर पल्स पोलिओ लसीकरण मोहीम ४.५३ लाखांहून अधिक बालकांना डोस

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :** पोलिओमुक्त भारताचा दर्जा कायम राखण्यासाठी जिल्हा परिषद पुणे व आरोग्य विभागाच्या वतीने रविवार, २८ जून रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार असून, जिल्ह्यातील ० ते ५ वर्षे वयोगटातील ४ लाख ५३ हजार ५१० बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे डोस देण्यात येणार आहेत. मोहिमेअंतर्गत एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले आहे.

पोलिओ हा बालकांना कायमचे अपंगत्व आणणारा गंभीर संसर्गजन्य आजार असून, जागतिक आरोग्य संघटनेने त्याच्या निर्मूलनाचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. भारतात २०११ नंतर पोलिओचा एकही रुग्ण आढळलेला नाही. तसेच पुणे जिल्ह्यात १९९९ नंतर पोलिओचा रुग्ण आढळलेला नसला, तरी शेजारील काही देशांमध्ये अद्याप पोलिओचे रुग्ण आढळत असल्याने प्रतिबंधात्मक उपाय म्हणून ही मोहीम सातत्याने राबविण्यात येत आहे.जिल्ह्यातील ३ हजार २८१ पोलिओ बूथ, १ हजार ६५४ पर्यवेक्षक, १ हजार ९९९ मनुष्यबळ, २०८ घरभेट पथके, १२४ ट्रान्झिट पथके, २२२ मोबाईल पथके आणि ७८ नाईट पथकांच्या माध्यमातून लसीकरण केले जाणार आहे. बसस्थानके, रेल्वे स्थानके, बाजारपेठा, धार्मिक स्थळे, प्रवासी केंद्रे तसेच खासगी दवाखान्यांमध्येही विशेष पथके कार्यरत राहणार आहेत.बूथवर उपस्थित राहू न शकलेल्या बालकांसाठी ग्रामीण भागात पुढील तीन दिवस, तर शहरी भागात पाच दिवस घरोघरी जाऊन लसीकरण केले जाणार आहे. मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारी, शिक्षक, सीएचओ तसेच विविध स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य घेतले जाणार असल्याची माहिती जिल्हा आरोग्य विभागाने दिली.

**ग्रामपंचायत श्रीरामनगर ता. हवेली जि.पुणे**

**बी-१ निविदा सूचना -१/२०२६-२७**

प्रशासक ग्रामपंचायत श्रीरामनगर ता. हवेली जि.पुणे येथे मौजे श्रीरामनगर येथे खालील कामासाठी बी-१ पद्धतीने जि.प यांचे कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदर यांच्याकडून निविदा बी-१ दोन लिफाफा पद्धतीने सिलबंद लिफाफा मध्ये निविदा मागविण्यात येत आहे. दि. ३०/०६/२०२६ सकाळी. १०.०० ते ०७/०७/२०२६ टु ५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात बंद लिफाफा मध्ये कार्यालयीन वेळेत सादर करण्यात याव्यात. सदर निविदा दि ०८/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा ग्रामपंचायत कार्यालय मध्ये उघडण्यात येतील.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम जीएसटी सह | अंदाजपत्रकीय रक्कम जीएसटी सोडून | इसारा रक्कम | कोरे निविदा रक्कम | कामाचा कालावधी | ठेकेदार वर्ग h |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे श्रीरामनगर येथे विहीर खोलीकरण करणे | ४९९५६२/- | ४२३३५७/- | ४२३४/- | २३६/- | ३ महिने | सु.बे.अ |
| २ | मौजे श्रीरामनगर येथे नळ पाणी पुरवठा दुरुस्ती करणे | २९९९३२/- | २५४१७२/- | २५४२/- | २३६/- | ३ महिने | सु.बे.अ |
| ३ | मौजे श्रीरामनगर येथे विहीर खोलीकरण करणे | २९९९३२/- | २५४१७५/- | २५४२/- | २३६/- | ३ महिने | सु.बे.अ |
| ४ | मौजे श्रीरामनगर येथे घनकचरा व्यवस्थापन करणे | ३९६३३८/- | ३३५८८०/- | ३३५९/- | २३६/- | ३ महिने | सु.बे.अ |

**निविदा अटी व शर्ती १**) कोणत्याही निविदा स्वीकारण्याचा अथवा निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतिकडे राखून ठेवला आहे **२**) कोऱ्या निविदा नमुन्याची फी (टेंडर फी) रक्कम ग्रामपंचायत श्रीरामनगर या नावाने चेक/कॅश ऑनलाईन भरून निविदा उपलब्ध होतील **३**) निविदा मधील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे तांत्रिक लिफाफा मध्ये सादर करण्यात याव **४**) इसारा रक्कम ग्रामपंचायत श्रीरामनगर या नावाने चेक/कॅश/ऑनलाईन/डीडी लिफाफा न १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय लिफाफा क्र २ उघडला जाणार नाही.

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत श्रीरामनगर**

**प्रशासक**
**ग्रामपंचायत श्रीरामनगर**

# गृह संस्थांच्या पातळीवर सहकाराची तत्त्वे रुजविणे आवश्यक : विद्याधर अनास्कर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट संस्कृती ही सहकार चळवळीचा महत्त्वाचा भाग असून गृह संस्थांच्या पातळीवर सहकाराची तत्त्वे प्रभावीपणे रुजविण्याची गरज आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी केले. केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या स्थापनेला पाच वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने २९ जून ते ६ जुलै या कालावधीत आयोजित सहकार सप्ताहाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. हा कार्यक्रम पाषाण येथील पुणे इंटरनॅशनल सेंटर (पीआयसी) येथे झाला.



**पुणे येथील सहकार सप्ताहाच्या उद्घाटनप्रसंगी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सहकार आयुक्त दीपक तावरे, हरनाम सिंग, सुहास दिवसे, सुहास पटवर्धन, सुभाष कर्णिक व अन्य मान्यवर उपस्थित होते.**

अनास्कर म्हणाले की, सहकार आणि राजकारण यांचे नाते जरी जवळचे असले तरी सहकार क्षेत्रात राजकारणाचा अतिरेक होऊ नये. राजकीय नेतृत्वाने सहकाराचे संरक्षण करणाऱ्या कुंपणाची भूमिका निभावावी. युवकांची आर्थिक क्षमता वाढविण्यासाठी सहकार क्षेत्रात नव्या संधी निर्माण करणे आवश्यक असून शालेय स्तरापासून सहकाराची बीजे रुजविण्यावर भर दिला पाहिजे. पूर्वी शाळांमध्ये सहकार भांडाराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सहकाराची प्रत्यक्ष ओळख करून दिली जात होती. मात्र, गेल्या दोन दशकांत अभ्यासक्रमातून सहकार विषयाला अपेक्षित स्थान मिळाले नसल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. गृहनिर्माण संस्थांना अधिक स्वायत्तता देऊन त्यांच्या समस्या त्या-त्या संस्थांच्या स्तरावरच सोडविणे गरजेचे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सनदी अधिकारी हरनाम सिंग होते. यावेळी राज्याचे सहकार आयुक्त व निबंधक दीपक तावरे, यशदाचे महासंचालक सुहास दिवसे, महाराष्ट्र हौसिंग अँड अपार्टमेंट फेडरेशनचे अध्यक्ष सुहास पटवर्धन, पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्थेचे उपाध्यक्ष सुभाष कर्णिक यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी सहकार प्रतिज्ञा घेत सहकार चळवळ अधिक बळकट करण्याचा संकल्प केला.

दीपक तावरे यांनी आपल्या भाषणात केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या स्थापनेनंतर गेल्या पाच वर्षांत सहकार क्षेत्रात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले. या निर्णयांमुळे सहकार क्षेत्र अधिक सक्षम व पारदर्शक होत असून त्याचा लाभ तळागाळातील सर्वसामान्यांपर्यंत पोहोचत असल्याचे त्यांनी नमूद केले.

उद्घाटनापूर्वी पाषाण येथील सक्सेस क्लब हाऊस येथे सहकार झेंडावंदन, वृक्षारोपण आणि सहकार दिंडीचे आयोजन करण्यात आले. उद्घाटन सत्रानंतर कृत्रिम बुद्धिमत्ता – काल, आज व उद्या या विषयावर महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे (एमकेसीएल) मुख्य मार्गदर्शक विवेक सावंत यांनी मार्गदर्शन केले.

# द • ख • ल

## श्रीगोंद्यात राजर्षी शाहू महाराज जयंती उत्साहात




**श्रीगोंदा :** लोकराजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त श्रीगोंदा शहरातील शनी चौक येथे संभाजी ब्रिगेडच्या वतीने अभिवादन व विचारप्रबोधन कार्यक्रम उत्साहात पार पडला. संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष इंजि. शामभाऊ जरे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित कार्यक्रमात सामाजिक न्याय, समता आणि शिक्षणाच्या विचारांचा जागर करण्यात आला. कार्यक्रमास तहसीलदार सचिन डोंगरे, पो. नि. संजय ठेंगे तसेच उपनगराध्यक्षा अलका अनभुले यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी इंजि. शामभाऊ जरे व अलका अनभुले यांनी शाहू महाराजांचे सामाजिक न्याय, शिक्षण, आरक्षण व बहुजन कल्याणासाठीचे ऐतिहासिक योगदान अधोरेखित केले. शाहू महाराजांच्या लोककल्याणकारी धोरणांमुळे वंचित समाजघटकांना मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळाल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास नगरसेवक पिनू काळे, एम. डी. शिंदे, सागर महाराज गोरे, रुषिकेश गायकवाड, आदेश शेंडगे, मंगेश मोटे, राजेंद्र उकांडे, दीपक मखरे, कांतीलाल कोकाटे, संजय डहाळे, शिवाजी गावडे, सोपान डाके, दिलीप लबडे, रवींद्र महंडूळे, संतोष आरडे, पांडुरंग खोरे, बापू जगताप, घनश्याम काळे, सद्दाम शेख यांच्यासह संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शाहूप्रेमी नागरिक उपस्थित होते.

## नांदूर पठार येथे सेंट्रल बँकेची मिनी शाखा



**टाकळी ढोकेश्वर :** पारनेर तालुक्यातील नांदूर पठार येथे सेंट्रल बँकेच्या मिनी शाखेचे उद्घाटन परभणी जिल्हा परिषद सदस्य आणि नांदूर पठार गावचे सुपुत्र भरत घनदाट आणि राष्ट्रवादीचे नेते दिपक लंके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भरत घनदाट यांनी गावात झालेल्या विकासाचे कौतुक केले तसेच ग्रामीण भागात बँकेची सुविधा उपलब्ध केल्याबद्दल सर्वांचे आभार मानले. गावात बँकेची मिनी शाखा झाल्यामुळे आता ग्रामस्थांना व्यवहार करणे सोपे होणार आहे. यावेळी रवींद्र राजदेव,सरपंच संदीप चौधरी,उपसरपंच सुनील राजदेव,मा.सरपंच भानुदास आग्रे,हरीभाऊ आहेर,नवनाथ पाटील घोलप, दत्तात्रय देशमाने, मारुती आग्रे, पंढरी आग्रे, ज्ञानदेव लक्ष्मण चौधरी, विलास महाराज आहेर, राजेंद्र राजदेव, रामदास राजदेव, बबन घोलप, स्वप्नील राजदेव, बाबाजी चौधरी, रामदास सांगळे, प्रकाश राजदेव, संतोष घनदाट, रामलाल राजदेव, नवनाथ आहेर, रवींद्र चौधरी, शुभम आहेर शिवाजी महाराज आग्रे, दादा पा. राजदेव, मोहन राजदेव, रामदास चौधरी, ज्ञानदेव श्रीपती चौधरी, भगवंत हाडवळे, राजाराम राजदेव, मंगेश आहिले, अमोल गाडगे, सागर शिरतार, विकास विद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक, प्राथमिक शाळेचे शिक्षक व ग्रामस्थ उपस्थित होते.

## श्रीगोंद्याचे पो. नि.ठेंगे यांचा सत्कार



**लिंपणगाव :** श्रीगोंद्याचे नव्याने रुजू झालेले पो.नि. संजय ठेंगे यांचा श्रीगोंदा तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नंदकुमार कुरुमकर यांच्या हस्ते नुकताच सत्कार करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष माधव बनसुडे, शहराध्यक्ष सोहेल शेख व पत्रकार संघाचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. दरम्यान श्रीगोंदा पोलीस स्टेशनला पो.नि. ठेंगे हे हजर झाल्यानंतर त्यांनी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मोठ्या उपाययोजना करतांनाच गुन्हेगांरावर वचक निर्माण केला. श्रीगोंदा पोलीस स्टेशनच्या आवारात विना नंबरच्या मोटरसायकली जप्त करून त्यांना कायदेशीर दंडही ठोठावला आहे. त्यामुळे वाहनचालकांनाही मोठी शिस्त लागली आहे.

## जामखेडमध्ये पिकअपच्या धडकेत युवकाचा मृत्यू


**जामखेड :** जामखेड शहरातील बीड रोडवरील मुंढे हॉस्पिटलसमोर शनिवारी रात्री झालेल्या अपघातात सिद्धेश्वर गणेश म्हेत्रे (वय ३२, रा. मुंजोबा गल्ली, जामखेड) या युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाला.



मोटारसायकलवर रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या सिद्धेश्वर म्हेत्रे यांना पाठीमागून भरधाव वेगाने आलेल्या पिकअप वाहनाने जोरदार धडक दिली. या अपघातात ते गंभीर जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असता उपचारापुर्वीच त्यांचे निधन झाले. या घटनेमुळे जामखेड शहरावर शोककळा पसरली असून नागरिकांमधून हळहळ व्यक्त होत आहे. जामखेड शहरातून जाणाऱ्या रखडलेल्या जामखेड-सौताडा राष्ट्रीय महामार्गाच्या कामाबाबत नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला. महामार्गाचे काम गेल्या अनेक वर्षांपासून अपूर्ण असल्याने शहरातील वाहतूक व्यवस्था कोलमडली आहे. त्यातच रस्त्यालगत वाढलेली अतिक्रमणे, अपुरी वाहतूक नियोजन व्यवस्था आणि सुरक्षिततेच्या उपाययोजनांचा अभाव यामुळे अपघातांचे प्रमाण सातत्याने वाढत असल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे.

## लिंपणगावच्या ग्रामस्थांचे ग्रामदैवताला साकडे!

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील लिंपणगाव येथील जागृत ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराज व श्रीगोंदा फॅक्टरी येथील देवस्थान श्री लिंगाळेश्वर महाराज यांना लिंपणगावच्या ग्रामस्थांनी भरपूर पाऊस पडून बळीराजाला साथ



द्या, अशा प्रकारे प्रार्थना केली. २९ जूनला लिंपणगाव ते श्रीगोंदा फॅक्टरी येथे दिंडी सोहळा आयोजित केला होता. पावसाळा सुरू होऊन जवळपास दोन महिने उलटले, परंतु लिंपणगाव कार्यक्षेत्रात कुठेच पाऊस पडलेला नाही, त्यामुळे गावावर मोठे जलसंकट निर्माण झाले आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार गाव परिसरात पाऊस पडला नाही तर ग्रामदैवत सिद्धेश्वर महाराजांचे कुठेतरी पावित्र्य राखले जात नाही. या श्रद्धेनुसार लिंपणगावच्या ग्रामस्थांनी सिद्धेश्वर मंदिरात एकत्रित महाआरती करून महाभिषेक घातला.

# वन भोजनातून जलसंधारण कामाच्या समाधानाची तृप्ती

## आम्ही टाकळीकरच्या जल अभियानाची यशस्वी सांगता

गंगाधर धावडे। राष्ट्र सह्याद्री

**टाकळी ढोकेश्वर :** पावसाळी वातावरणातील थंड हवेतील आल्हादायक गारवा... त्यात घरच्या डब्यांमधील विविध व्यंजनांचा घमघमाट.. विविध प्रकारच्या चटण्या.. लोणची... झणझणीत लाल - हिरव्या मिरच्यांचा ठेचा.. तोंडी लावायला कांदा, लसूण, लिंबू, काकडीच्या फोडी... अन् ताज्या गावरान आंब्याचे पाड - जांभळांची स्वीट डिश... पंचतारांकित हॉटेलच्या महागड्या मेनूला फिकी पाडणारी असल गावरान फक्कड मेजवानी व सोबतीला निसर्गाच्या सानिध्यात जल अभिनयाच्या गप्पांची



मैफील जमल्यावर आपोआप सर्वांची ब्रम्हानंदी टाळी लागली!

निमित्त होते आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानने नाम फाऊंडेशनसह विविध संस्थांच्या सहयोग व लोकसहभागातून राबविलेल्या जलसंधारण कामाच्या दुसऱ्या टप्प्याच्या यशस्वी सांगता पाहणी प्रसंगी आयोजित केलेल्या वन स्नेहभोजनाची.

यावेळी डॉ. बाळासाहेब बांडे, रावसाहेब रोहोकले, डॉ.भाऊसाहेब खिलारी, संतोष सोनवळे, बाळासाहेब खिलारी, शिवाजीराव खिलारी, रामभाऊ तराळ, दत्तात्रय निवडुंगे, प्रताप खिलारी, संदीप खिलारी, मेजर दिगंबर शेळके, आदिनाथ पायमोडे, मंगेश खिलारी, दादाभाऊ नवले, संदीप झावरे, आनंदा झरेकर, श्रावण गायकवाड, प्रा.किसन पायमोडे, नानासाहेब झावरे, रविंद्र पायमोडे, वसंत रांधवण, संजय कुसकर, दादा निवडुंगे, राहुल धुमाळ, नितीन धुमाळ, महेश धुमाळ, शिवाजी कोरडे, सचिन बांडे, महेश ठाणगे, जालिंदर बांडे,संकेत थोपटे,दीपक ढूस, गणेश चव्हाण, शुभम गुंदेचा, कृष्णा बांडे, सागर थोपटे, संजय झावरे, अतुल सैद, नितीन ढोकळे, विष्णू बद्रे, नितीन ढोकळे, बाबाजी कासुटे तसेच युवक, शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

### लोकसहभागातूनच घडेल जलक्रांती

राळेगणसिद्धी व हिवरे बाजार या गावांनी पाण्याचे महत्त्व जाणून जलसंवर्धन केल्याने या गावांचा केवळ पाणी प्रश्न सुटला नसून त्यांची जागतिक पातळीवर नोंद झाली आहे.भविष्यात पुढील संघर्ष हा राजकीय नसून पाण्यावरून होणार आहे त्यामुळे ही गंभीर बाब लक्षात घेऊन सर्वांनी पाण्याचे महत्व ओळखावे. यासाठी स्थानिक नागरिकांमध्ये जलसाक्षरता निर्माण होणे आवश्यक असून लोकसहभागातूनच खऱ्या अर्थाने जलक्रांती घडेल असा विश्वास वाटतो.

**डॉ.बाळासाहेब बांडे**

## भाजप तरुणांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणारा पक्ष : महाडिक

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** पारनेर येथील भारतीय जनता पार्टीच्या मुख्य कार्यालयात भाजपा युवा मोर्चाचा भव्य कार्यकर्ता मेळावा अत्यंत उत्साहात आणि भव्य वातावरणात संपन्न झाला. या मेळाव्याला भाजपा युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज दादा महाडिक यांची मुख्य उपस्थिती लाभली होती. त्यांच्या उपस्थितीने तालुक्यातील युवा कार्यकर्त्यांमध्ये कमालीचा उत्साह पाहायला मिळाला.

### युवाशक्ती हीच पक्षाची खरी ताकद : कृष्णराज महाडिक

ऋमेळाव्यात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना प्रदेशाध्यक्ष कृष्णराज दादा महाडिक म्हणाले की, भारतीय जनता पार्टी हा तरुणांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणारा पक्ष आहे. आगामी काळात पक्षाची ध्येयधोरणे आणि सरकारच्या जनकल्याणकारी योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत


छाया : दत्ता गाडगे

पोहोचवण्याची मुख्य जबाबदारी ही युवा मोर्चाच्या खांद्यावर आहे. तरुणांनी संघटित होऊन समाजकार्यात आणि राजकारणात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

या मेळाव्यादरम्यान पारनेर तालुक्यातील चालू घडामोडी आणि पक्ष संघटनेच्या मजबुतीकरणावर सविस्तर चर्चा करण्यात आली. पारनेर भाजप कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला भाजप राज्य परिषद सदस्य विश्वनाथ कोरडे, सरचिटणीस सुभाष दुधाडे,महिला जिल्हाध्यक्ष अश्विनी थोरात, मंडल अध्यक्ष राहुल शिंदे पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष सचिन वायकर, मा.नगराध्यक्ष नितीनराव अडसूळ,नगरसेवक युवराज पठारे, दूध संघ अध्यक्ष दत्ता नाना पवार, युवा मोर्चा उपाध्यक्ष पंकज कारखिले, कल्याण थोरात, लहू भालेकर, सोनाली आंबेकर, अतुल माने, अर्जुनराव नवले,जयदीप सालके पाटील, संग्राम पावडे, कानिफनाथ ठुबे यांसह ज्येष्ठ नेते, स्थानिक पदाधिकारी, युवा मोर्चाचे जिल्हा व तालुका पातळीवरील लोकप्रतिनिधी आणि शेकडो तरुण कार्यकर्ते उपस्थित होते.

## वटपौर्णिमेनिमित्त इनर व्हील क्लब ऑफ शेवगावचा समाजोपयोगी उपक्रम

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**शेवगाव :** वटपौर्णिमेच्या पावन निमित्ताने इनर व्हील क्लब ऑफ शेवगाव यांच्या वतीने एक मूठ धान्य - गरजूंना मदतीचा हात हा समाजोपयोगी उपक्रम उत्साहात संपन्न झाला. वटवृक्ष पूजनासोबतच पर्यावरण संवर्धन आणि समाजसेवा यांचा सुंदर संगम घडवून आणणाऱ्या या उपक्रमाला शेवगावकर माता-भगिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे उद्घाटन नगरसेविका आशा खंडू बुलबुले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सीमा बोरुडे यांची होती. वटपौर्णिमेच्या पूजेनंतर काही वटवृक्षाजवळ विड्याची पाने, हरभरा डाळ, साखर, गहू, आंबे, ब्लाऊज पीस, खोबरे, खारीक, गूळ, हळकुंड पूजेच्या वस्तू भटक्या जनावरांमुळे विखुरून पडल्यामुळे पर्यावरणाची हानी होते. त्या वस्तू खाल्ल्याने जनावरांनाही त्रास होऊ शकतो. ही बाब लक्षात घेऊन पूजेसाठी आणलेले धान्य गरजूंपर्यंत पोहोचविण्याचा स्तुत्य संदेश या उपक्रमातून देण्यात आला. संकलित धान्य उचल फौंडेशन तसेच स्मशान जोगी समाजातील गरजूंना देण्यात आले. पूजेसाठी आणलेले आंबे उचल फौंडेशनमधील मुलांना वाटण्यात आले.

धान्य संकलनासाठी मंगल काकडे यांनी मिरी रोड परिसराची, अश्विनी गवळी यांनी ब्रह्मा सिटी परिसराची, तर सुनीता गवळी यांनी बीएसएनएल टॉवरसमोरील परिसराची जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडली. यावेळी रूपाली तडवळकर, डॉ. मनीषा लड्ढा, भाविका आर्य, वसुधा सावरकर, अनुजा लड्ढा, निर्मला खैरे, स्वाती बडदे सदस्य भारती बाहेती, शितल बडदे आणि क्लबच्या इतर सर्व सदस्य भगिनी उपस्थित होत्या. शेवगावकर माता-भगिनींनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हा उपक्रम यशस्वी झाला.

## विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक-पालक समन्वय आवश्यक : औटी

### वडझीरे हायस्कुल मध्ये शिक्षक पालक मेळावा उत्साहात संपन्न

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** श्रीमती सुंदराबाई गहिनाजी लंके माध्यमिक व आनंदीबाई नारायण एरंडे उच्च माध्यमिक विद्यालय, वडझिरे येथे शिक्षक-पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. हा मेळावा उत्साहात संपन्न झाला.या मेळाव्यात इयत्ता आठवी तील एन.एम.एम.एस. शिष्यवृत्ती परीक्षेस पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचा तसेच इयत्ता दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी पालक मेळाव्यात विद्यालयात राबविण्यात येत असलेल्या विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांची माहिती शिक्षक संदीप शिंदे यांनी दिली.विद्यालयातील गुरुकुल प्रकल्पाविषयी शिक्षिका श्रीमती मोनाली राहणे यांनी सविस्तर माहिती सांगितली. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शना बाबत शिक्षक प्रमोद रोहोकले यांनी विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध संधी व तयारीचे महत्त्व स्पष्ट केले.

तसेच पालकांची जबाबदारी


छाया : दत्ता गाडगे

व भूमिका या विषयावर शिक्षिका श्रीमती अश्विनी काळे यांनी मार्गदर्शन केले. इन्स्पायर अवॉर्ड आणि रयत ऑलिंपियाड या उपक्रमांविषयी शिक्षक प्रणव वाळुंज यांनी माहिती दिली.यावेळी पालक प्रतिनिधी म्हणून बोलताना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघांचे अहिल्या नगर जिल्हाध्यक्ष दत्ता गाडगे म्हणाले, विद्यार्थ्यां मधील गुणवत्ता वाढीसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व खेळांमध्ये प्रगती होण्यासाठी स्पोर्ट्समध्ये प्रगती होणे गरजेचे असल्याचे सांगितले. सध्या शालेय गुणवत्ता चांगले असून याहीपेक्षा अधिक चांगले काम करण्यासाठी पालकांनी शिक्षकांना सहकार्य करणे गरजेचे असल्याचे सांगितले.पालक

युवराज मोरे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमा साठी प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजीराव औटी उपस्थित होते. यावेळी बोलताना औटी म्हणाले, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक-पालक समन्वय आवश्यक असून पालकांनी आपला विध्यार्थी घरी आल्यावर काय करतो याकडे लक्ष देणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले.अध्यक्षीय भाषणात शिवाजी आप्पा मोरे यांनीही विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी पालकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा,असे आवाहन केले.

विद्यालयाचे प्राचार्य बाबाजी राऊत यांनी विद्यालयाच्या गुणवत्ता पूर्ण शिक्षणाची हमी देत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी विद्यालय कटिबद्ध असल्याचे सांगितले.

कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महादू तोडकर त्याचप्रमाणे उपाध्यक्ष युवराज मोरे,सामाजिक कार्यकर्ते राजकुमार मोरे,माजी रयत सेवक हरिभाऊ चौधरी,माजी विद्यार्थी रोहिदास लंके त्याच प्रमाणे मोठ्या संख्येमध्ये पालक वर्ग उपस्थित होता.

शिक्षक पालक मेळावा यशस्वीपणे पार पाडण्यात सर्व सेवकांचे सहकार्य लाभले.

## वटपौर्णिमेनिमित्त वटवृक्ष पूजनासह महामातांच्या चरित्रग्रंथांचे वाटप



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा शहरालगत असलेल्या साळवनदेवी मंदिर परिसरात वटपौर्णिमेनिमित्त संभाजी ब्रिगेडच्या वतीने वटवृक्ष पूजनासह राजमाता जिजाऊ, राजमाता अहिल्याबाई होळकर, माता सावित्रीबाई फुले आणि माता रमाई आंबेडकर यांच्या जीवनकार्यावरील पुस्तकांचे महिलांना वाटप करण्यात आले.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे नाना शिंदे यांनी उपस्थित महिलांशी संवाद साधत सामाजिक प्रबोधन केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील हिरकणीच्या मातृत्वाचा उल्लेख करत त्यांनी मातृत्व, संस्कार आणि कुटुंबातील जबाबदारीचे महत्त्व अधोरेखित केले.

ते म्हणाले, पतीच्या दीर्घायुष्यासाठी महिलांनी वटवृक्षाला सात फेरे मारण्याची परंपरा जपावीच; मात्र आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी, चांगल्या संस्कारांसाठी आणि शिक्षणासाठी प्रतीकात्मक दोन फेरेही मारावेत. समाज घडविण्याची खरी ताकद मातांच्या संस्कारांत आहे.

यावेळी त्यांनी राजमाता जिजाऊ, राजमाता अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले आणि माता रमाई यांच्या कार्याचा उल्लेख करत, त्यांनी अंधश्रद्धेपेक्षा शिक्षण, समाजप्रबोधन, वृक्षसंवर्धन, लोककल्याण आणि राष्ट्रनिर्मितीला प्राधान्य दिल्याचे सांगितले. त्यांच्या विचारांचे आचरण करणे हीच त्यांना खरी आदरांजली असल्याचे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित महिलांना महामातांच्या जीवनचरित्रावरील पुस्तके भेट देण्यात आली.

# शिराळ चिचोंडी परिसरात विजेचा खेळखंडोबा

## सब स्टेशन असून अडचण नसून खोळंबा!

रमेश पाथरकर। राष्ट्र सह्याद्री

**शिराळ चिचोंडी :** पाथर्डी तालुक्यातील शिराळ येथे गेल्या दोन वर्षापासून पाच के व्हीचे नवीन सब स्टेशन झाले आहे परंतु हे सब स्टेशन झाल्यापासून शिरा ळचिचोंडी कोल्हार गितेवाडी डमाळवाडी या गावांना वीज पुरवठा होतो परंतुहे सब स्टेशन कोणत्याही प्रकारचे लोड घेत नसल्याने पाच पाच मिनिटाला वीज पुरवठा खंडित होतो

या भागातीलशेतकरी व्यवसायिक आणि सर्वसामान्य जनता कमालीची त्रस्त झाली आहे एका बाजूला कोणाचा प्रचंड उकाडाआणि दुसऱ्या बाजूला वस्तीवरील गडद अंधार अशा दुहेरी संकटात नागरिक सापडले असून महावितरणाच्या या गलथान कारभाराविरुद्ध परिसरातून तीव्र संताप व्यक्त होत आहे या गंभीर परिस्थिती दखल घेत माजी सभापती संभाजी पालवे यांनी महावितरणाला थेट इशारा दिला आहे

मेरी आणि शिराळ सब स्टेशनच्या कर्मचाऱ्यांनी ही विजेची समस्या तात्काळ सोडवावी अन्यथाकुतोंडी परिसरातील जनतेचा उद्रेक होईल आणि महावितरणाच्या विरोधात मोठे जन आंदोलन केले जाईल असा कडक इशारा पालवे यांनी प्रसार माध्यमाची बोलताना दिला काही दिवसापूर्वीच अत्यंत गाजावाजा करून शिराळ येथे नवीन वीज उपकेंद्र सुरू करण्यात आले होते या नवीन सबस्टेशन मुळे परिसराचा वीज प्रश्न कायमचा मिटेल अशीअशा नागरिकांना होती मात्र हे सब स्टेशन होऊन गेल्या अनेक दिवसापासून शेतकरी आणि व्यवसायिकाच्या पदरीनिराशाच आली आहे

नवीन यंत्रणा असूनही विजेचा मोठा त्रास सहन करावा लागत असल्याने हे सब स्टेशन चिचोंडी परिसरातील केवळ पांढरा हत्ती ठरत आहे की काय असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे

ज्यांनी अद्याप फोनवर बसवलेली नाही किंवा ज्यांना घरगुती आणि शेतीसाठी सिंगल फेज विजेची गरज आहे त्यासाठी वीज वितरण कंपनीने सहा तासाची रोटेशन ठरवून दिली आहे मात्र हे रोटेशन ही कंपनीला व्यवस्थित पाळता आलेले नाही कधी वाऱ्याची तर




कधी पावसाचे किरकोळ निमित्त काढून दिवस वीज गायब ठेवली जात असल्याने वितरणाच्या नियोजनाचे पुरते वाभाडे निघाले आहे

मग वीज जाते कुठे नागरिकांचा सवाल स ध्या शा स ना च्या विविधयोजनांमुळे बहुतांश शेतकऱ्यांनी शेतात सोलर यंत्रणा बसवली आहे त्यामुळे दिवसात पंपाचा अतिरिक्त भार महावितरणाच्या यंत्रणेवर नाही अशा परिस्थितीत जर शेतीचे विच पंप सुरू नाही तर मग ही लाईट नेमकी जाते कुठे असा सवाल सर्वसामान्य जनतेकडून विचारला जात आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री


श्रीरामपूर : वटपौर्णिमेनिमित्ताने महावटवृक्षाला महिलांचे सात फेरे ( छाया - अमोल कदम )



# राज्यात कायदा-सुव्यवस्था रामभरोसे

## खासदार सुप्रिया सुळेंचा सरकारवर कडाडून हल्ला!



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : छत्रपती संभाजीनगर येथील नियोजित आंदोलनासाठी निघाल्या असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी सोमवारी शिर्डीत जाऊन साईबाबांच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेतले. त्यांनी साईचरणी राज्याच्या कल्याणासाठी साकडे घातले.

मात्र, दर्शनानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी राज्यातील बिघडलेली कायदा-सुव्यवस्था आणि ढासळलेल्या राजकीय संस्कृतीवरून सत्ताधार्यांवर अत्यंत तीक्ष्ण शब्दांत प्रहार केला, राज्यातील सद्यस्थितीवर तीव्र चिंता व्यक्त करताना सुप्रिया सुळे म्हणाल्या,विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे जिल्ह्यात सध्या गुन्हेगारीने भयानक डोके वर काढले आहे.

ही बाब अत्यंत चिंतेची आहे. केवळ पुणेच नव्हे, तर संपूर्ण राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे रामभरोसे झाली आहे. यावेळी त्यांनी केंद्रीय गृहमंत्रालयाने जाहीर केलेल्या गुन्हेगारीच्या आकडेवारीचा दाखला देत, राज्याच्या गृह विभागाच्या अपयशावर थेट निशाणा साधला. राजकारणात सध्या पैशाचा आणि सत्तेचा ज्या पद्धतीने नंगानाच सुरू आहे, त्यावर सुळे यांनी तीव्र संताप व्यक्त केला. आज समाजात लोकप्रतिनिधींबद्दल अत्यंत उपहास आणि नकारात्मक चर्चा होत आहे, ही महाराष्ट्रासाठी दुर्दैवी बाब आहे. शिवछत्रपती आणि यशवंतराव चव्हाणांच्या महाराष्ट्राला आपण कोणत्या पातळीवर नेऊन ठेवले आहे, याचा विचार करण्याची वेळ आता आली आहे, अशा शब्दांत त्यांनी सत्ताधाऱ्यांच्या कार्यपद्धतीचे वाभाडे काढले.

नेत्यांकडून वापरल्या जाणाऱ्या खालच्या पातळीच्या भाषेवर टीका करताना त्यांनी माजी केंद्रीय मंत्री अरुण जेटली यांच्या एका विधानाचा संदर्भ दिला. माध्यमांनी अशा वाचाळ वीरांना प्रसिद्धी देणे थांबवले, तर अनेक नेत्यांची बोलती आपोआप बंद होईल, असा मार्मिक टोला त्यांनी लगावला.

### मविआमध्ये 'ऑल इज वेल'; उद्धव ठाकरेशी नियमित संवाद

या दौऱ्यादरम्यान सुप्रिया सुळे यांनी महाविकास आघाडीत (मविआ) पूर्ण एकजूट असल्याचे ठासून सांगितले. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी आपला नियमित संवाद असल्याचे स्पष्ट करत त्यांनी भविष्यातील मोठ्या राजकीय संघर्षाचे संकेत दिले आहेत. सुप्रिया सुळे यांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे राज्यातील राजकीय वर्तुळात आता चर्चांना उधाण आले असून सत्ताधारी यावर काय पलटवार करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# लोणी व्यंकनाथ परिसरात बिबट्याचा धुमाकूळ

## पाळीव जनावरांवर सलग हल्ले, ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा, प्रतिनिधी : श्रीगोंदा तालुक्यातील लोणी व्यंकनाथ येथील खामकरवाडी शिवारात बिबट्याचा वावर वाढल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून बिबट्याकडून पाळीव जनावरांवर सलग हल्ले होत असून वन विभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.



खामकरवाडी येथील शेतकरी नामदेव जठार यांच्या चार बकऱ्यांवर बिबट्याने हल्ला केला. त्यापैकी एक बकरी उचलून नेली, तर उर्वरित बकऱ्या गंभीर जखमी झाल्या. तसेच अमोल सत्रे यांच्या शेळीवर हल्ला करून तिला जागीच ठार करण्यात आले. रामभाऊ डांगे यांच्या कुत्र्यावरही बिबट्याने हल्ला केला. तर दत्तात्रेय भोसले यांच्या गाईवर झडप घातली; मात्र ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे गाईचा जीव वाचला.

बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे संध्याकाळनंतर नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून शेतात जाणेही धोकादायक बनले आहे. ग्रामस्थ फटाके फोडणे, मिरचीची धुरी करणे अशा उपाययोजना करून बिबट्याला परतविण्याचा प्रयत्न करत आहेत.

सुदैवाने अद्याप कोणत्याही व्यक्तीवर हल्ला झालेला नसला तरी लहान मुले आणि शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे.वन विभागाने तातडीने घटनास्थळी पाहणी करून पिंजरा लावणे, रात्री गस्त वाढविणे आणि बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी खामकरवाडी परिसरातील ग्रामस्थांनी केली आहे.

# श्रीरामपुरात पहिल्याच पावसात दुर्घटना

## 'नानाज् चहा' आणि मेडिकल दुकानावर इमारतीचा 'स्लॅब'चा कोपरा कोसळला!




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : शहरातील शिवाजी रोडवर सोमवारी सकाळी १० वाजेच्या दरम्यान एका जुन्या इमारतीचा स्लॅबचा कोपरा कोसळल्याची गंभीर घटना घडली. हा स्लॅब खाली असलेल्या 'नानाज् चहा' आणि एका मेडिकल स्टोअर्सच्या पत्र्याच्या शेडवर पडला. विशेष म्हणजे पहिल्याच भिज पावसात घडलेल्या या दुर्घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, चहा पिण्यासाठी आलेले ग्राहक आणि नागरिक थोडक्यात बचावले आहेत. शिवाजी रोड हा शहरातील गजबजलेला परिसर आहेत. येथील एका इमारतीमध्ये 'नानाज् चहा' हे प्रसिद्ध दुकान आणि शेजारीच एक मेडिकल स्टोअर्स आहे. नेहमीप्रमाणे या दुकानाबाहेर ग्राहक चहा घेण्यासाठी आणि औषधे खरेदीसाठी उभे होते. यामध्ये शहरातील काही प्रतिष्ठित नागरिकांचाही समावेश होता.अचानक इमारतीचा वरचा कोपरा (स्लॅब) थेट खाली असलेल्या पत्र्याच्या शेडवर कोसळला. मोठा आवाज आणि झालेल्या गोंधळामुळे नागरिकांची प्रचंड पळापळ झाली. या दुर्घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी मोठी वित्तहानी झाली आहे.दुकानाबाहेर उभी असलेली एक दुचाकी (टू-व्हीलर) चेपली आहे.दुकानाचे बोर्ड आणि पत्र्याचे शेड पूर्णपणे निकामी झाले आहे. हॉटेलमधील खाद्यपदार्थ आणि चहाचे मोठे नुकसान झाले आहे. या दुर्घटनेनंतर शहरातील जीर्ण आणि धोकादायक इमारतींचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पहिल्याच पावसात जर इमारतीचे भाग कोसळत असतील, तर आगामी पावसाळ्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.श्रीरामपूर नगरपालिकेने शहरातील मुदत संपलेल्या आणि जीर्ण झालेल्या सर्व इमारतींचे त्वरित सर्वेक्षण करावे. अशा इमारतींच्या धारकांना तात्काळ नोटिसा बजावून योग्य ती कारवाई करावी, जेणेकरून भविष्यात कोणतीही जीवितहानी होणार नाहीत. सुदैवाने या घटनेत केवळ वित्तहानी झाली असून सर्व ग्राहक सुरक्षित आहेत, मात्र प्रशासनाने यातून धडा घेऊन तातडीने पावले उचलण्याची गरज निर्माण झाली आहे.

# अखेर रावसाहेब खेवरे यांचा उ.बा.ठा. गटाला जय महाराष्ट्र !

## राहुरीतूनही शिवसेना (उबाठा)ला मोठा धक्का । अहिल्यानगर जिल्ह्याची राजकीय समीकरणे बदलणार !

राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : शिवसेना ठाकरे गटाचे माजी जिल्हाप्रमुख रावसाहेब खेवरे यांचा शिंदे शिवसेनेत संभाव्य प्रवेश होणार असल्याने तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलण्याचे संकेत दिसून येत आहेत. ठाकरे यांच्या शिवसेनेतील पक्षफुटीनंतर सुरू असलेल्या राजकीय घडामोडींमध्ये राहुरी तालुक्यातूनही शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला मोठा धक्का बसला असून ठाकरे गटाची शिवसेना पक्षाचे माजी जिल्हाप्रमुख तथा राहुरी तालुक्यातील शिवसेनेचे प्रभावी नेतृत्वाची ओळख असलेले रावसाहेब खेवरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत जाण्याचा निर्णय घेतल्यामुळे या निर्णयामुळे राहुरी तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्याच्या



राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले आहे.

उद्धव ठाकरे गटाच्या जिल्हाप्रमुखपदावरून पायउतार झाल्यानंतर पक्ष नेतृत्वावर नाराज असलेले खेवरे यांनी अखेर ठाकरे गटाला सोडचिठ्ठी देत त्यांनी आपला राजीनामा पक्ष नेतृत्वाकडे सोपविला असून शिंदे यांच्या शिवसेनेसोबत जाण्याचा निर्णय घेतल्याचे खात्रीलायक वृत्त समजलेआहे. गेल्या ४० वर्षापासून हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे आवडते म्हणून खेवरे नाना यांची ख्याती होती. त्यांच्या संपर्काच्या माध्यमातून रावसाहेब खेवरे यांनी तळागाळातील कार्यकर्त्यांचे मजबूत संघटन केले होते.कुठलाही दुजा भाव न ठेवता सर्वसामान्यांच्या कौटुंबिक जीवनात त्यांनी अनेक प्रकारे मदत केली होती. त्यामुळे राहुरी तालुक्यातील त्यांचा जनसंपर्क, कार्यकर्त्यांचे मजबूत जाळे आणि संघटन कौशल्य लक्षात घेता हा प्रवेश ठाकरे गटासाठी मोठा धक्का मानला जात आहे.

ठाणे येथे रावसाहेब खेवरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली आहे. त्यांना शिंदे गटाकडे आणण्यासाठी शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांचा मोठा सहभाग आहे. उपजिल्हाप्रमुख सचिन बडधे, रामहरी सिकंडे, दीपक पंडित, अनिल बांगरे, मच्छिंद्र धुमाळ, सोमनाथ गोरे, सुनील शेलार, डॉ. संजय म्हसे, पोपट शिरसाठ, हरिभाऊ शेळके, राजूभाऊ झावरे यांच्यासह अनेक पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते. यावेळी शिवसेना नेते प्रशांत मुसमाडे यांनी महत्त्वपूर्ण समन्वय साधला. दरम्यान ठाकरे गटाचे जिल्हा संघटक रावसाहेब खेवरे यांच्यासह हरिभाऊ शेळके अहिल्यानगर उत्तरचे उपजिल्हाप्रमुख, रामहरी तिकांडे उपजिल्हाप्रमुख, सचिन बडदे, उपजिल्हाप्रमुख श्रीरामपूर, डॉ संजय म्हसे, शहर प्रमुख, राहुरी, अशोक सातपुते तालुका समन्वयक संगमनेर यांच्यासह अनेकांनी सामूहिक राजीनामे पक्ष नेतृत्वाकडे पाठविले आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर खेवरे यांच्या पक्षांतरामुळे राहुरी तालुक्यातील तसेच शिर्डी लोकसभा मतदारसंघातील राजकीय समीकरणांवर परिणाम होण्याची शक्यता राजकीय जाणकारांकडून व्यक्त केली जात आहे.

# विसापूरच्या चिकन सेंटरमध्ये गांजा विक्री करणाऱ्या एकास अटक : एक फरार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : बेलवंडी पोलीस स्टेशनच्या पथकाने विसापूर येथे अवैधरित्या गांजा विक्री करणाऱ्यांविरुद्ध धडक कारवाई करत ७८० ग्रॅम गांजा जप्त केला. या कारवाईत एका आरोपीला अटक करण्यात आली असून मुख्य आरोपी पोलिसांना चकवा देत फरार झाला आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांना २८ जून रोजी गोपनीय माहिती मिळाली होती की, विसापूर येथील अमीन शफी शेख हा 'भाई-भाई चिकन सेंटर' येथे गांजा विक्रीसाठी साठवून ठेवत आहे.



या माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ छापा टाकला. छाप्यामध्ये गुंजीलाल कान्हा मेहता (वय २४, रा. शेंदवा, ता. शेंदवा, जि. बडवानी, मध्य प्रदेश) हा गांजा विक्री करताना आढळून आला. त्याच्या ताब्यातून ७८० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. त्याला अटक करण्यात आली असून मुख्य आरोपी अमीन शफी शेख हा घटनास्थळावरून फरार झाला आहे. या प्रकरणी अमली पदार्थ विक्रीच्या उद्देशाने गांजा बाळगल्याप्रकरणी संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार आरोपीचा पोलीस शोध घेत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे व कर्जत विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय नंदकुमार सोनवलकर, पोलीस हवालदार भाऊसाहेब यमगर, धर्मराज दहिफळे, भाऊसाहेब शिंदे, पोलीस कर्मचारी दादा क्षीरसागर, विनोद पवार आणि विठ्ठल खरमाळे यांनी केली.

# कत्तलखान्यावर पोलिसांचा छापा; ७६ हजाराचा मुद्देमाल हस्तगत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : नगर शहरातील कत्तलखान्यावर स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करून ७६ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक दिपक मेढे, अरविंद भिंगारदिवे, सुनिल पवार, शाहीद शेख, गणेश धोत्रे, योगेश भिंगारदिवे यांच्या पथकाने ही कारवाई केली. फकीर गल्लीच्या बोळीत एका पत्र्याच्या शेडमध्ये काही इसम गोवंश जनावरांची कत्तल करताना पथकाला दिसून आले. मुनावर फकीर सय्यद (वय ४०), नविद रफिक कुरेशी (वय ३०), सालीम फय्याज अहमद कुरेशी (वय ३३, सर्व रा. सुभेदार गल्ली, झेंडीगेट) अशी त्यांची नावे असल्याचे सांगितले. त्यांनी सदरचे काम आयुनल फयाज अहमद कुरेशी (रा. सुभेदार गल्ली, झेंडीगेट) याच्या सांगण्यावरुन करत असल्याचे सांगितले. ४६, हजार रूपये किंमतीचे २३० किलो गोमांस, २५, हजाराचे खिमा तयार करण्याचे मशिन, ५०० रूपये किमतीचे. ( सुरा, सत्तुर, टोचा,) ५ हजार रूपये किंमतीचा एक इलेक्ट्रीक वजन काटा, असा एकुण ७६ हजार ५०० रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# आरक्षण सोडतीनंतर टाकळीभानची राजकीय गणिते बदलली!

## ग्रामपंचायत आरक्षण सोडत जाहीर : टाकळीभानकरांना 'कही खुशी, कही गम'चा अनुभव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या टाकळीभान ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी सोमवारी (२९ जून) प्रभागनिहाय आरक्षण सोडत जाहीर होताच गावातील राजकीय वातावरण चांगलेच तापले. काही इच्छुकांच्या गळ्यात उमेदवारीची माळ पडण्याची शक्यता निर्माण झाल्याने त्यांच्या गोटात आनंदाचे वातावरण होते, तर अनेक इच्छुकांचे राजकीय गणित एका क्षणात कोलमडल्याने त्यांच्या चेहऱ्यावर निराशा स्पष्ट दिसून आली.

त्यामुळे आरक्षण सोडतीनंतर गावात अक्षरशः 'कही खुशी, कही गम' अशीच चर्चा रंगली. यापूर्वी पदाधिकारी व ग्रामस्थांच्या मागणीनुसार




आरक्षण सोडत पुन्हा घेण्यात आली होती. त्यामुळे कोणत्या प्रभागात कोणते आरक्षण पडणार, याकडे सर्व इच्छुकांचे लक्ष लागले होते. अखेर पंचायत समितीचे विस्तार अधिकारी ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कामगार तलाठी रूपाली रामटेके व ग्रामसेवक भिंगारदे यांच्या उपस्थितीत पारदर्शक पद्धतीने आरक्षण सोडत पार पडली.

जाहीर झालेल्या आरक्षणानुसार प्रभाग क्रमांक १ मध्ये अनुसूचित जाती व्यक्ती, नामप्र व्यक्ती व सर्वसाधारण महिला, प्रभाग २ मध्ये नामप्र महिला, सर्वसाधारण महिला व सर्वसाधारण व्यक्ती, प्रभाग ३ मध्ये अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती व्यक्ती व सर्वसाधारण व्यक्ती, प्रभाग ४ मध्ये अनुसूचित जाती व्यक्ती व सर्वसाधारण महिला, प्रभाग ५ मध्ये अनुसूचित जाती महिला, नामप्र महिला व सर्वसाधारण व्यक्ती, तर प्रभाग ६ मध्ये दोन सर्वसाधारण महिला व एक सर्वसाधारण व्यक्ती अशी आरक्षण रचना निश्चित झाली.

प्रभाग क्रमांक १ व २ मधील नामप्र महिला तसेच प्रभाग ३ व ५ मधील अनुसूचित जमाती आरक्षणासाठी ईश्वर चिठ्ठी पद्धतीने शालेय विद्यार्थ्यांच्या हस्ते सोडत काढण्यात आली. टाकळीभान ही तालुक्यातील मोठी व राजकीयदृष्ट्या प्रतिष्ठेची ग्रामपंचायत असल्याने सर्वच राजकीय गटांनी आता उमेदवारांची जुळवाजुळव, नवीन समीकरणे आणि संभाव्य आघाड्यांच्या हालचाली सुरू केल्या आहेत. अनेक विद्यमान इच्छुकांना प्रभाग बदलण्याचा किंवा पर्यायी उमेदवार देण्याचा पर्याय स्वीकारावा लागणार असल्याने आगामी काही दिवसांत गावातील राजकीय घडामोडींना अधिक वेग येण्याची शक्यता व्यक्त होत आहे. यावेळी शिवाजीराव शिंदे, यशवंत रणनवरे, उपसरपंच कान्हा खंडागळे, राजेंद्र कोकणे, मयूर पटारे, राहुल पटारे, भारत भवार, विलास दाभाडे, जयकर मगर, एकनाथ पटारे, दत्तात्रय नाईक, अविनाश लोखंडे, सुनील बोडखे, नारायण काळे, अनिल कोकणे, अनिल बोडखे, भाऊसाहेब पटारे, सुधीर मगर, सुभाष पटारे, अक्षय कोकणे, संभाजी पटारे, आप्पासाहेब रणनवरे, बापूसाहेब शिंदे, सुजित बोडखे, तुकाराम बोडखे, सचिन नागले, भाऊसाहेब गव्हाणे, विलास बोडखे, मच्छिंद्र पटारे, सुरेश पटारे, संदीप जाधव, बालाजी साळवे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी माजी उपसरपंच भारत भवार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

अनेक इच्छुकांची उमेदवारी धोक्यात
काही नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता.
प्रभागनिहाय नवीन आघाड्या व गटबाजीला वेग.
प्रतिष्ठेच्या ग्रामपंचायतीत प्रत्येक जागेसाठी चुरशीची लढत अपेक्षित.

### प्रभाग क्रमांक ४ वर अन्याय - राहुल पटारे

आरक्षण सोडतीनंतर प्रभाग क्रमांक ४ मध्ये सर्वसाधारण व्यक्तीसाठी जागा न मिळाल्याने या प्रभागावर अन्याय झाल्याची भावना माजी चेअरमन राहुल पटारे यांनी व्यक्त केली. त्यांच्या या प्रतिक्रियेमुळे आरक्षण सोडतीनंतर राजकीय चर्चेला आणखी उधाण आले असून, पुढील काळात या मुद्द्यावर स्थानिक पातळीवर चर्चा रंगण्याची शक्यता आहे.